
# पुण्यात अश्लील चाळे करणारा गौरव अहुजा गजाआड

**पुणे** : राज्याची सांस्कृतिक राजधानी पुण्यामध्ये भर चौकात अश्लील चाळे करणारा गौरव मनोज



अहुजा याच्या मुसक्या अखेर पोलिसांनी आवळल्या आहेत. मद्यधुंद गौरव अहुजा याने शनिवारी (दि. ८) लक्झरी गाडी रस्त्याच्या मधोमध उभी करून वाहतुकीला अडथळा केला आणि सिग्नलवरच लघुशंका केली. या वेळी लोकांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला असता त्याने अश्लील चाळे करीत अनैतिक वर्तन केले. पोलीस सकाळपासून त्याचा शोध घेत होते. अखेर तो पोलिसांच्या हाती लागला. यानंतर गौरव अहुजा याच्या माफी मागतानाचा व्हिडीओ समोर आला आहे, मात्र त्याने केलेल्या अश्लील कृत्यामुळे पुण्यासह राज्यात संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे आता गौरवची कुंडलीच समोर येत आहे. त्याने याआधीही जेलवारी केलेली असून जुगाराचा आणि खंडणीचा गुन्हा त्याच्यावर दाखल आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक २३२

www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, ९ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


अलिबागेत पोलीस मित्र शिल्पाचे अनावरण/२

रोह्यात वणव्याच्या घटनांमध्ये वाढ/५


आशियाई कबड्डी स्पर्धेत भारतीय संघ विजेता/८


# चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आज भारत-न्यूझीलंड मेगा फायनल

**दुबई : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत रविवारी (दि. ९) भारत आणि न्यूझीलंड संघांमध्ये दुबई येथील स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. या स्पर्धेचा हा नववा हंगामा आहे, जो पाकिस्तान आणि दुबईमध्ये खेळला जात आहे. भारत अंतिम फेरीत पोहचल्यामुळे जेतेपदाचा सामना दुबईमध्ये रंगणार आहे.

भारतीय संघाने २०२५च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आतापर्यंतचे सर्व सामने जिंकले आहेत. टीम इंडियाने पहिल्या सामन्यात बांगलादेश आणि नंतर पाकिस्तानला हरवले. यानंतर गट टप्प्यातील शेवटच्या सामन्यात त्यांनी



न्यूझीलंडला पराभूत केले. मग उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियावर विजय मिळवला.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात भारत आणि न्यूझीलंडचे संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत आमनेसामने येत आहेत. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत यापूर्वी २०००मध्ये दोन्ही संघ आमनेसामने आले होते, ज्यामध्ये टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर २०१९मध्ये झालेल्या वनडे विश्वचषकाच्या उपांत्य फेरीतही 'किवी' संघाने भारताला मात दिली होती. आता त्या पराभवांचा बदला घेण्याची टीम इंडियाला संधी आहे.

दुबईतील हवामानाबद्दल बोलायचे झाले, तर ॲक्क्युवेदरच्या अहवालानुसार ९ मार्च रोजी दुबईमध्ये पावसाची शक्यता नाही. तरीही जर पावसामुळे सामना खेळवता आला नाही तर राखीव दिवशी पूर्ण होईल. आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यासाठी १० मार्च हा राखीव दिवस ठेवला आहे.

# विकसित भारतासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

महिलांच्या योगदानाशिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. २०२९पर्यंत राजकीय क्षेत्रात मिळणाऱ्या आरक्षणामुळे महाराष्ट्र हे 'महिला राज्य' होणार आहे. त्याचबरोबर २०४७मध्ये विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण करताना महिलांचा सहभाग हा महत्त्वाचा ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. ८) केले.

जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालविकास विभागामार्फत 'बेटी बचाओ बेटी पढाओ' राज्यस्तरीय समारोप व कन्यारत्न यांचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन राजभवन येथे करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, विभागाचे आयुक्त नयना गुंडे, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, महिला स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्य आदी उपस्थित होते. या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, लोकसंख्येत ५० टक्के महिला असून महिलांना केंद्रस्थानी ठेवून मानव संसाधन विकसित केल्यास देश विकसित होईल हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखले आणि म्हणूनच लेक लाडकी ते बेटी बचाओ बेटी पढाओ, लखपती दिदीपर्यंत योजना सुरू करून त्या प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यातील बालविवाह बंद झाले आहेत आणि लिंगभेदाचे, भ्रूणहत्येचे प्रमाण कमी झाले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी सुरू केलेल्या क्रेडिट सोसायटीचा विस्तार वाढवून उद्योगात आपले अस्तित्व मजबूत करायचे आहे, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

केंद्र आणि राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्याच्या योजनांमुळे बचत गटाच्या माध्यमातून महिला उद्यमशील बनत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था अधिक बळकट होत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

मंत्री आदिती तटकरे यांनी, बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमाला दहा वर्ष पूर्ण होत आहेत. मुलींचा जन्मदर वाढावा तसेच महिलांच्या शिक्षणातून त्यांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी प्रधानमंत्री यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. ही योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे अव्वल राज्य ठरले आहे, असे सांगितले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहाय्याने राज्यस्तरीय क्रेडिट सोसायटी स्थापन करणार असल्याचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांनी सांगितले.

या वेळी राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांना त्यांच्या कार्याबद्दल गौरविण्यात आले तसेच अन्य महिला रत्नांचा सत्कार करण्यात आला.

### शिवरायांचे छायाचित्र असलेल्या 'रूपे कार्ड'चे अनावरण

*छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले 'रूपे कार्ड' मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. मल्टि मोडल ट्रान्सपोर्ट एक्सेस त्यात उपलब्ध आहे. याद्वारे डिजिटल सुरक्षितता आणि इन्शुरन्ससुद्धा मिळणार आहे तसेच पेमेंट करण्यासाठी क्यूआर कोडही देण्यात आला आहे. या कार्डचे या वेळी अनावरण करण्यात आले. देशात 'रूपे कार्ड' देणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे.*




# विमानतळ सुरू झाल्यानंतर पनवेलचे नाव जगाच्या नकाशावर येणार -आमदार प्रशांत ठाकूर

## हिरकणी महोत्सवात महिला भगिनींशी साधला संवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यानंतर पनवेल शहराचे नाव जगाच्या नकाशावर येणार आहे. त्यामुळे विकासकामांच्या बाबतीत महापालिकेला जोमाने काम करावे लागणार आहे. या कामात सर्वांचे योगदान पाहिजे आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हिरकणी महोत्सवाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि. ७) करण्यात आले होते. पनवेलकर महिलांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देऊन हा महोत्सव उत्साहात साजरा केला. दरम्यान, या महोत्सवास आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत उपक्रमाचे कौतुक केले व महिला भगिनींशी संवाद साधला.

हिरकणी महोत्सवात बचत गटांचे स्टॉल्स, आरोग्य शिबिर, स्वरक्षणाचे धडे, सायबर व्याख्यान तसेच खेळ पैठणीचा, गीत, संगीत, गायन, नृत्य, महाराष्ट्राची लोकसंस्कृती असे कार्यक्रम झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरीबद्दल तीन आशा स्वयंसेविकांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये महापालिकेच्या अग्निशमन दलातील शुभांगी घुले व तेजश्री साळुंखे यांनी घवघवीत यश मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे म्हणाले की, पनवेल महापालिकेच्या वतीने आयोजित हिरकणी महोत्सवात महिलांच्या उद्योग-व्यवसायाला चालना मिळावी, त्यांचे आरोग्य उत्तम रहावे या उद्देशाने राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यापुढेही महापालिका महिलांसाठी विविध उपक्रम राबविणार आहे.

या महोत्सवास माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दरम्यान, बचत गटांच्या स्टॉल्सला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत पाहणी केली.



## निवडक

### हम्पीमध्ये पर्यटकांना मारहाण; महिलांवर बलात्कार, एकाचा मृत्यू

**हम्पी** : कर्नाटकातील हम्पी येथे सानापूर तलावाजवळ चार देशी-विदेशी पर्यटक होम स्टे मालक महिलेसह रात्री भटकंतीसाठी आले होते. त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. यात ओडिशातील एका पर्यटकाचा मृत्यू झाला, तर इस्रायलची २७ वर्षीय महिला पर्यटक आणि २९ वर्षीय होम स्टे मालक महिलेवर बलात्कार करण्यात आला. इतर दोन पर्यटकांना दुखापत झाली असून त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### दिल्लीत महिला समृद्धी योजनेला सरकारची मंजुरी

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी भारतीय जनता पक्षाने दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. दिल्ली सरकारने महिला समृद्धी योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेंअतर्गत पात्र लाभार्थ्यांना महिन्याला २५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी शनिवारी (दि. ८) याबद्दलची घोषणा केली.

# पंतप्रधान मोदींनी साधला लखपती दिदींसोबत संवाद

**नवसारी : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. ८) गुजरातच्या नवसारी येथे लखपती दिदींची भेट घेत बोर्ड रूम



शैलीत संवाद साधला. नोटपॅड आणि पेन हातात घेऊन पंतप्रधान चर्चा करत असताना लखपती दिदींचे महत्त्वाचे मुद्दे नोंद करून घेत होते.

या वेळी बहुतेक महिलांनी पंतप्रधान मोदींच्या लखपती दिदी बनण्यामागची प्रेरणा स्पष्ट केली. तुमच्या धोरणांमुळे आणि तुम्ही दिलेल्या प्रेरणेमुळेच त्या आम्ही लखपती दिदी बनू शकलो, असे या महिला पंतप्रधानांना म्हणाल्या.

लखपती दिदींना आलेल्या सकारात्मक अनुभवांना ऐकल्यानंतर पंतप्रधान मोदींनी समाधान व्यक्त केले. तीन कोटी लखपती दिदींचे उद्दिष्ट लवकरच पार केले जाऊ शकते आणि पुढील काळात पाच कोटींपर्यंत आपण पोहचू शकतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले, तर पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली काही वर्षांत आम्ही लखपती दिदी कार्यक्रमापेक्षा करोडपती दिदी या कार्यक्रमात भाग घेऊ, असा विश्वास या लखपती दिदींनी या वेळी व्यक्त केला.

व्यवसाय विस्ताराच्या योजनेवर चर्चा करताना, पंतप्रधान मोदींनी लखपती दिदींना त्यांच्या व्यवसायाला ऑनलाईन करण्याचा सल्ला दिला. बाजारपेठेत प्रवेश मिळवण्यासाठी ऑनलाईन व्यवसाय करणे महत्त्वाचे असल्याचे पंतप्रधान म्हणाले. ग्रामीण भागातील महिलाच विकसित भारत मार्गावर पुढे जातील, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

# काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांना नोटीस

**मुंबई : प्रतिनिधी**


काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार यांना मुंबई उच्च



न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोटीस बजावली आहे. निवडणूक प्रकरणात उच्च न्यायालयाने ही नोटीस बजावून वडेट्टीवार यांना चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार वडेट्टीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी मतदारसंघातून विजय मिळवला होता. त्यांच्याविरुद्ध स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार ॲड. नारायण जांभुळे यांनी उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली आहे. वडेट्टीवार यांनी नामनिर्देशन पत्रासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावर जांभुळे यांनी आक्षेप घेतलेला आहे.

# दर्शन अन् आशीर्वाद!





पनवेल, मुंबई : आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या लग्नाचा रौप्य महोत्सवी वाढदिवस शनिवारी होता. यानिमित्ताने या दाम्पत्याने प्रभादेवी येथे श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले. तत्पूर्वी त्यांनी वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आई शकुंतला ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले.

# होळी, धुळवडीचे लागले वेध!

## रंग, पिचकाऱ्यांनी बाजारपेठ सजली

**पनवेल : वार्ताहर**

होळीचा सण येत्या गुरुवारी १३ मार्च रोजी, तर दुसऱ्या दिवशी धुळवड आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठ सजली आहे. लहान मुलांसाठी रंग, पिचकारी खरेदीसाठी ग्राहकांची बाजारात लगबग दिसून येत आहे.

पनवेलच्या बाजारपेठेत विविध प्रकारचे नैसर्गिक रंग, लहानग्यांचे आकर्षण असणाऱ्या आकर्षक पिचकाऱ्या विक्रीसाठी आल्या आहेत. या साहित्याने बाजारपेठ फुलली आहे. त्यामुळे खरेदीसाठी ग्राहकांची विशेषत: लहानग्यांची पावले तिकडे वळत आहे.

यंदा रंगांचे व पिचकाऱ्यांचे दर १० टक्क्यांनी वाढले आहेत. तरीही हौसेपोटी खरेदी कमी



नाही. ग्राहकांकडून नैसर्गिक रंगांना अधिक पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे. नैसर्गिक सुके रंग ८० ते १०० रुपये, तर ओले रंग १८० रुपयांमध्ये उपलब्ध आहेत. त्याचबरोबर साधारणपणे १०० ते ५०० रुपयांपर्यंत बाजारात पिचकाऱ्या उपलब्ध असून यामध्ये विविध कार्टून पिचकाऱ्यांची क्रेज पाहायला मिळत आहे. पाठीवर लावल्या जाणाऱ्या ड्रमच्या पिचकाऱ्याही बाजारात भाव खात आहेत.

# क्रूझरचा अपघात; दोन जणांचा मृत्यू

**बुलढाणा : प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर सिंदखेडराजा परिसरात भरधाव क्रूझरचा टायर फुटून शनिवारी (दि. ८) भीषण अपघात झाला. यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला असून तिघे गंभीर जखमी आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील आसेगाव देवी येथील भाविक शिर्डी दर्शनासाठी निघाले असताना त्यांच्या क्रूझर (एमएच २५ आर ३५७९) वाहनाचा टायर फुटला. वाहन वेगात असल्याने ही गाडी सुरक्षा कठड्याला धडकून उलटली. या अपघातानंतर मागून येणाऱ्या दुसऱ्या एका कारचे (एमएच २९ सीबी ९६३०) नियंत्रण सुटल्याने तीदेखील क्रूझरवर आदळली. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासन कुठेही कमी पडणार नाही!

## ◆ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

महिलांच्या सुरक्षेसाठी शासन कडक कायदे करत आहे. कायद्याच्या अंमलबजावणीबरोबरच समाजात महिलांप्रति असलेली मानसिकतादेखील बदलणे गरजेचे आहे. महिलांच्या तक्रारींचे तातडीने निरसन करण्यात येत आहे. समाजमाध्यमांवर मॉर्फिंग आणि डीपफेक व्हिडिओंच्या माध्यमातून होणारे गैरप्रकार थांबविण्यासाठी सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने अशा गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन ठोस उपाययोजना करीत आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासन कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.८) जागतिक महिला दिनानिमित्त महिला पत्रकारांसोबत साधलेल्या संवादादरम्यान दिली.




जागतिक महिला दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला पत्रकारांना शुभेच्छा देऊन सह्याद्री अतिथीगृह येथे संवाद साधताना महिलांच्या सशक्तीकरणासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे मांडले. महिलांना विविध क्षेत्रांमध्ये भेडसावणाऱ्या अडचणी, त्यांच्या सुरक्षेचे मुद्दे आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठीच्या सरकारी उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला. समाजाची मानसिकता बदलण्यासाठी आणि स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केले. राज्यमंत्री पंकज भोयरसुद्धा या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी माध्यम क्षेत्रातील महिलांसमोरच्या आव्हानांवर भाष्य करताना सांगितले की, महिलांना मल्टीटास्किंग करत अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. माध्यम क्षेत्रातील महिलांना तर २४ तास दक्ष राहावे लागते. व्यवसाय, घर आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना प्रत्येक टप्प्यावर अनेक संघर्ष करावे लागतात.

महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून विविध क्लस्टर्समध्ये महिला उद्योजकांसाठी खास संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तसेच, मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने १० हजार महिलांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात प्रशिक्षित करण्याचे अभियान हाती घेतले आहे.

भविष्यातील नोकऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित असतील आणि महिलांनी त्यात आघाडीवर राहावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. प्रशासनात काम करणाऱ्या महिला अधिकारी त्यांच्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडत असून या या कामात त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. राज्याच्या मुख्य सचिवांपासून प्रशासनातील विविध विभागांत महत्त्वाच्या पदांवर महिला अधिकारी आहेत.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्यातील महामार्गांवर प्रत्येक ५० किमी अंतरावर सार्वजनिक स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच, त्यांचे दीर्घकालीन व्यवस्थापन आणि देखभाल करण्यासाठी ठोस योजना आखण्यात आली आहे.

माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संचालक हेमराज बागुल, संचालक किशोर गांगुर्डे आणि संचालक दयानंद कांबळे या वेळी उपस्थित होते.

### लव्ह जिहादविरोधात कठोर भूमिका

*लव्ह जिहाद प्रकरणावर मुख्यमंत्री म्हणाले की, सुरुवातीला अशा घटना एक-दोन अपवाद म्हणून वाटत होत्या, पण तपासानंतर लक्षात आले की हा मोठ्या प्रमाणावर चाललेला प्रकार आहे. अनेक मुली फसवल्या जात असून त्यावर कठोर कारवाई आवश्यक आहे. त्यामुळे आम्ही अधिकाऱ्यांची विशेष समिती तयार केली असून, त्यांना या प्रकरणांचे सखोल विश्लेषण करण्याचे निर्देश दिले आहेत.*

# अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर पोलीस मित्र शिल्पाचे अनावरण




**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर उभारण्यात आलेल्या पोलीस मित्र शिल्पाचे अनावरण शनिवारी (दि. ८) महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व समुद्रकिनाऱ्यांवर गन कार देणार, असे आश्वासन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या वेळी दिले.

जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, भाजप अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अमित नाईक आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

आर सी एफ कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून अलिबाग पोलिसांना एटीव्ही कार देण्यात आली. त्याचे लोकार्पणदेखील महिला व बालविकास मंत्री तटकरे यांचे हस्ते करण्यात आले.

रायगड जिल्ह्यात २८ समुद्रकिनारे आहेत. जेथे पर्यटक जातात. काही समुद्रकिनाऱ्यावर पर्यटक जात नाहीत. या सर्व समुद्राकिनाऱ्यांवर परताकांच्या सुर्काशेसाठी पोलिसांची गस्त ठेवावी. त्यासठी पोलिसाना गन कार देल्या जातील. प्रायोगिक तत्वावर सुरवातील मोजक्या समुद्रकिनाऱ्या या गन कार उपलब्ध करून दिल्या जातील. टप्प्याटप्प्याने सर्व समुद्रकिनाऱ्यांवार गस्त घालण्यासाठी पोलिसांना गन कार दिल्या जातील, असे ना. आदिती तटकरे यांनी सांगितले.

## वाहतुकीचे नियम पाळणाऱ्यांना गुलाबपुष्प

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण-पनवेल मार्गावर प्रमाण कमी होण्याच्या हेतूने उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली फुंडे-कॉलेज रोडवर उरण येथे विदाउट हेल्मेट या स्पेशल ड्राईव्ह अंतर्गत हेल्मेट परिधान करणाऱ्या चालकांना पोलिसांनी गुलाबाचे फुल देवून प्रोत्साहित केले.



वाहन चालकांनी वाहतुकीचे नियम पाळा, विदाउट हेल्मेट मोटर सायकल प्रवास करू नका, मोठा सायकल चालवतांना वेग मर्यादेचे पालन करावे. अशा प्रकारची जनजागृती उरण वाहतूक पोलिसांनी केली.

# महिला दिनानिमित्त कर्करोग प्रतिबंध आणि निदानावर सीकेटी महाविद्यालयात व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि इनरव्हील क्लब, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने (दि.८) जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कर्करोग प्रतिबंध आणि निदान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी डॉ. वीणा मनोहर, अध्यक्ष, इनरव्हील क्लब, पनवेल, डॉ. प्रभा बागडे, कर्करोग तज्ञ, पनवेल, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील तसेच इनरव्हील क्लब, पनवेलच्या सदस्य मीनल टिपणीस, सुलभा निंबाळकर, डॉ. सुलभा जोशी, वंदना दाते, शामला आंग्रे, शुभांगी पत्की, संगीता जगताप, वंदना बडगुजर ह्या उपस्थितीत होत्या.

या वेळी महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सर्व महिला प्राध्यपिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर डॉ. वीणा मनोहर यांनी इनरव्हील क्लबची व क्लबमार्फत करण्यात येणाऱ्या कार्याची माहिती सांगितली. त्यानंतर प्रमुख वक्त्या डॉ. प्रभा बागडे यांनी कर्करोगास प्रतिबंध कसा करावा?, कर्करोगाची लक्षणे, कर्करोगाचे निदान व उपाययोजना याविषयी मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी सर्व महिला प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच महिला विकास कक्षाच्या वतीने सर्व महिलांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या व्याख्यानासाठी ७२ महिला प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाला आय.क्यू. ए. सी. समन्वयक प्रो.डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस.एन. वाजेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सोनाली हुद्दार, प्रा. भावेश भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार महिला विकास कक्षाच्या माजी अध्यक्ष डॉ. स्मिता भोईर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महिला विकास कक्षाच्या सदस्य देवश्री गाडगीळ यांनी केले.

## कोन गावात घरफोडी

**पनवेल :** तालुक्यात घरफोडीच्या घटना वाढत आहेत. अशातच कोन गावात पहाटे झालेल्या घरफोडीत चोरट्याने घरातील रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि साहित्यासह घरगुती गॅस सिलिंडरही चोरल्याची घटना घडली आहे. कोन गावात घराची कडी तोडून चोराने प्रवेश केला. घरातील २९ हजारांची रोख रक्कम, ४० हजार रुपयांची सोनसाखळी, घड्याळ आणि घरगुती गॅस सिलिंडर असा मुद्देमाल घेऊन चोरटा पसार झाला आहे.

# सीकेटी विद्यालयात जागतिक महिला दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी विद्यालयातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमामध्ये मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान सर्व महिला वर्गासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, अनघा भोसले यांनी महिलांचे प्रत्येक क्षेत्रात असलेले सामर्थ दर्शवत सुंदर अश्या गीताचे सादरीकरण केले. तबला विशारद संतोष खरे व शिक्षिका सुनीता भगत यांनी आपल्या स्वरचित गीताने तसेच श्रद्धा म्हात्रे व स्नेहल कडाव यांच्या सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले तसेच संगीत विशारद रूपेश मढवी यांनी समस्त महिला वर्गाप्रती आदरयुक्त भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, तसेच इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली.

## उरणच्या ग्रामीण रुग्णालयात जागतिक महिला दिन उत्साहात

**उरण : बातमीदार**

इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, उरण येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेवक राजू ठाकूर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इतकरे, नितीन पाटील, ए. पी. आय. सतीश गोरे यांनी उपस्थिती दर्शवली.



कार्यक्रमात विशेषतः रुग्णालयातील सफाई कामगार मोनिका जाधव, प्रियांका मसे, रासिका पाटील आणि वस्त्र धुलाई कर्मचारी रजनी काटे यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या कमी पगारामुळे आणि अनेकदा तीन-तीन महिने वेतन न मिळाल्यामुळे त्यांना गिफ्ट, रोपटं आणि आर्थिक मदत देऊन त्यांच्या कष्टाची दखल घेण्यात आली. विशेष म्हणजे त्या महिलांना मंचावर प्रमुख अतिथींसोबत मानाचे स्थान देण्यात आले, आणि आपल्या भाषणात त्यांनी रुग्णालयातील सर्व डॉक्टर आणि कर्मचारी वर्गाचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच इतर सर्व महिलांचा सत्कार करून त्यांच्या योगदानाची प्रशंसा करण्यात आली.

इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी. एम. कालेल आणि संपूर्ण कर्मचारी वृंद कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या उपक्रमातून महिलांच्या कष्टाला आदर देत, त्यांच्या सशक्तीकरणाचा आणि सामाजिक न्यायाचा संदेश देण्यात आला.

# खारघरमध्ये पेन्शनसंदर्भात सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.८) वुमन डेव्हलपमेंट सेलच्या वतीने निवृत्तीनंतर पेन्शनचे नियोजन कसे करावे यावरती सत्राचे आयोजन केले होते.



प्रमुख उद्देश महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर त्यांना त्यांच्या पेन्शनचा योग्य रीतीने वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणूक करता यावी हा होता. या सत्रासाठी गणेश घोणे व मुकेश शहा यांनी पेन्शनच्या गुंतवणुकीबद्दल तसेच आर्थिक दृष्ट्या भविष्यामध्ये नियोजन कसे करायचे याविषयी मार्गदर्शन केले.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल वुमन डेव्हलपमेंट सेलचे कौतुक केले.

प्रा. सोनी पांडे समन्वयक, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय प्राचार्या निशा नायर, वुमन डेव्हलपमेंट सेल, वुमेन डेव्हलपमेंट सेल समितीतील सदस्य व प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## पनवेलमध्ये महिला सुरक्षेबाबत जनजागृती

**खारघर : प्रतिनिधी**

महिला दिनानिमित्त पनवेल येथील बस डेपोत वाहतूक पोलिसांच्या माध्यमातून महिलांना महिला सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. संकटाच्या वेळेला ११२ डायल करण्यासह वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत ही जनजागृती करण्यात आली.



नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे यांच्या संकल्पनेतून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज पाटील पोलीस उपनिरीक्षक सुशांत खराटे, पोलीस अंमलदार संजय गावडे पोलीस अमलदार सचिन पाटील यांनी पनवेल बस डेपो याठिकाणी महिला वाहक तसेच इतर प्रवासी यांना महिला दिनाच्या गुलाबपुष्प देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

महिलांवर अत्याचाराच्या घटना वाढत असताना वेळ पडल्यास आत्मरक्षणासाठी महिलांनी हिमतीने पुढे येण्याची मानसिकतादेखील महिलांनी तयार केली पाहिजे. तसेच अत्यावश्यक वेळेला ११२ सारख्या टोल फ्री हेल्पलाईनची मदत आपण घेतली पाहिजे, असेही या वेळी सांगण्यात आले.

### दुखवटा

#### सुमन आचोळकर

**पनवेल :** श्री अमरनाथ सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हॉटेल व्यावसायिक कामधून फुडस् नवीन पनवेलचे सुनील आचोळकर यांच्या मातोश्री सुमन आचोळकर (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची मुले व सुना, नातवंडे, असा परिवार आहे. कै. सुमन आचोळकर यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.१३) सकाळी ९ वा. श्री बल्लाळेश्वर मंदिर, वीर सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल येथे तसेच १३वा विधी रविवारी (दि.१६) निवासस्थानी होणार आहे.



#### रमेश पारखे

**माणगाव :** जुने माणगावचे माजी पोलीस पाटील सुभाष पारखे यांचे थोरले बंधू रमेश भगवान पारखे (वय ७१) यांचे शुक्रवारी (दि.७) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ,चार मुली, एक मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने समस्त पारखे परिवारावर शोककला पसरली आहे. कै. रमेश पारखे यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.१६) तर उत्तरकार्य विधी मंगळवारी (दि.१८) माणगाव बाजारटेप येथे होणार आहे.



# विविध सरकारी योजनांचा महिलांना लाभ -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र व राज्य सरकारने महिलांकरीता सुरू केलेल्या विविध योजनांचा अनेक महिलांनी लाभ घेतला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भाजप उत्तर रायगड महिला मोर्चाच्या वतीने कृतज्ञता सन्मान सोहळ्याचा आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते.

पनवेल येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अनेकांच्या हस्ते महिलांचा सन्मान करण्यात आला.




## भाजपतर्फे नारीशक्तीचा गौरव

या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. पल्लवी पवळे, अ‍ॅड. चित्रा कलंत्री, पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमौल, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, महिला मोर्चाच्या सरचिटणीस अ‍ॅड. वृषाली वाघमारे, संध्या शारबिंदे, शहराध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेविका नीता माळी, प्रतिभा भोईर, कोमल कोळी यांच्यासह महिला मोर्चाच्या पदाधिकारी नगरसेविका कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दरम्यान, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा या वेळी कृतज्ञता म्हणून सन्मान करण्यात आला.

महिला शक्तीचे रूप असून त्याचा प्रत्यय प्रत्यक्ष क्षणोक्षणी आपल्याला येत असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली देशाची सूत्र हाती घेतली आणि त्यानंतर मोदी सरकारने विविध योजना महिलांकरिता राबवल्या आहेत. या योजनेमुळे अनेक महिलांनी लाभ घेतला आहे, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल येथे झालेल्या महिला दिनाच्या कार्यक्रमात व्यक्त केल. या वेळी नाच ग घुमा या मंडळाच्या वतीने ओम ऑनलाईन नमः या नाटिकेचा आयोजनही करण्यात आले होते.

# पनवेलमध्ये सहा दुकाने जळून खाक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटी दुर्गामाता मंदिरासमोर असलेल्या जे के प्लाझा कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये शनिवारी (दि.८) सकाळी अचानकपणे आग लागून फर्निचरची सहा दुकाने जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ असनलेल्या जे के प्लाझा कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या बंद सहा फर्निचरच्या दुकानांना अचानकपणे आग लागली. या आगीने रौद्ररुप धारण केले होते व त्याचा फटका या कॉम्प्लेक्समध्ये असलेले हॉस्पिटल तसेच इतर खासगी कार्यालयांना बसणार होता, परंतु पनवेल महापालिकेच्या अग्नीशमन दलाच्या पथकाला या घटनेची माहिती मिळताच त्वरित घटनास्थळी येवून शर्तीचे प्रयत्न करून २० ते २५ मिनिटात आग आटोक्यात आणली.तेव्हा नागरिकांना हायेसे वाटले. आग ही शॉर्ट सर्कीटमुळे लागली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला आहे. या आगीत करोडो रुपयाचे नुकसान झाल्याचे समजते.

दरम्यान, पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तसेच अर्चना ठाकूर यांनी नुकसान झालेल्या दुकानांच्या मालकांची फोनवरून विचारपुस केली.

# संस्कृतीबरोबर विचारांची देवाणघेवाण ठेवा -निता बालदी



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

संस्कृतीच्या संवर्धनाबरोबर विचारांची देवाण घेवाण महत्त्वाची असून, महिला सक्षमीकरण हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, संस्कृतीचे जतन करा, असा संदेश भाजपच्या निता बालदी यांनी दिला.

ग्रामीण भागातील महिलांना हळदीकुंकू सोहळ्याचा आनंद घेता यावा यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने, महिलांच्या सौभाग्याचे प्रतीक समजल्या जाणाऱ्या हळदीकुंकू सोहळ्याचे आयोजन चिरनेरच्या प्रसिद्ध श्री महागणपती मंदिरात शुक्रवारी (दि. ७) मार्च रोजी सायंकाळी चारच्या सुमारास करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी हा संदेश दिला.

दरम्यान या वेळी घेण्यात आलेल्या लकी ड्रॉच्या कार्यक्रमात भारती पाटील या मानाच्या पैठणीच्या पहिल्या क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. प्रतीक्षा मोकल यांनीही लकी ड्रॉमध्ये दुसऱ्या क्रमांकाची मानाची पैठणी पटकाविली. मानसी पाटील या लकी ड्रॉमध्ये तिसऱ्या क्रमांकाच्या धनी ठरल्या. त्यांनाही स्मार्ट वॉच देण्यात आला. माई रेवसकर या चौथ्या क्रमांकाने विजयी झाल्या. त्यांनाही घड्याळ देण्यात आले. प्रियांका पाटील पाचव्या क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.

कार्यक्रमाला निता बालदी यांच्यासह माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, उरण तालुका भाजप महिला अध्यक्ष अ‍ॅड. राणी म्हात्रे, सुनिता राजेंद्र खारपाटील, भाजपच्या उरण शहराध्यक्षा संपूर्णा थळी, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, माजी नगरसेविका रजनी कोळी, भाजपच्या उरण उपाध्यक्षा संगीता गायकवाड, उत्तर रायगडच्या उपाध्यक्षा नंदा म्हात्रे, जासई गाव अध्यक्षा मनीषा घरत या सर्वांचे चिरनेरच्या भारतीय जनता पार्टीच्या सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी औक्षण करून, स्वागत केले.

# एमएनएम विद्यालयात महिला दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला न्हावाशेवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक सावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



विद्यालयात महिला दिनाच्या औचित्य साधून पाककला स्पर्धा आणि वकृत्व स्पर्धेचा आयोजन करण्यात आले होते. विद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, नाव्हा शेवा पोलीस स्टेशनच्या सोनवणे मॅडम, चेअरमन भार्गव ठाकूर, शाळेचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# महिला दिनानिमित्त कर्करोग जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त उलवे तिसरी मुंबई नारि शक्ती टिम आणि दिपिशा कैसर सेंटर अँड रिसर्च इन्स्टिटच्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे येथे कर्करोग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला नारी शक्ती महासचिव मोर्चा नवी मुंबई, शिक्षिका, कवयित्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या देविका मिश्रा, जीवदानी उत्कर्ष महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनंदा अमर म्हात्रे, राज्य अध्यक्षा अखिल भारतीय मानवाधिकार महाराष्ट्र राज्य विनिता वरफे, मुंबई नारी शक्ती संघाच्या अध्यक्षा अर्चना छांगूर चौहान, डॉ. फेलो संकल्प, आश्चर्य संकल्प, आश्चर्य कांबळे आदी उपस्थित होते.

दिपिशा कैसर सेंटर अँड रिसर्च इन्स्टिटच्यूटच्या डॉ.दिपाली गोडघाटे यांनी महिलांमध्ये कॅन्सरबाबत जनजागृती करण्यासाठी अतिशय योग्य पद्धतीने मार्गदर्शन केले. विशेष अतिथी म्हणून आलेल्या नारी शक्ती यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.



पनवेल : हॉटेल कृष्णाकाठ हे उलवे सेक्टर ९ येथे नवीन सुरू झाले आहे. त्याचे उद्घाटन गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते तसेच उलवे नोड भाजप महिला मोर्चा अध्यक्ष योगिता भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी अनंता ठाकूर, जयवंत देशमुख, किशोर पाटील, सुहास भगत, संदीप म्हात्रे, सुदर्शन भगत तसेच हॉटेलचे मालक शामराव मोरे, विशाल मोरे आदी उपस्थित होते.





उरण : कामगार नेते सुरेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तसेच भारतीय मजदूर महासंघाच्या राष्ट्रीय महामंत्रीपदी निवड झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# गुळसुंदे येथे घरकुल योजनेचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या घरकुल महाआवास अभियानांतर्गत जागतिक महिला दिनी ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे येथे रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना तसेच पीएम जनमन आवास योजना घरकुलांचा शुभारंभ सरपंच मिनाक्षी भास्कर जगताप-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.



या वेळी संबधित घरकुल महिला लाभार्थी तसेच ग्रा.पं सदस्य अरुणा अभिजित पाटील, आशा गजानन वीर, दिपाली प्रवीण जगताप, अपर्णा संतोष चौलकर, रचना रूपेश चव्हाण, काव्या हर्षल जोशी, सदस्य महेश पाटील, रमेश मालुसरे, जितेंद्र पाटील, आयत्या शिद तसेच ग्रामविकास अधिकारी रामदास दासगावकर उपस्थित होते.

ही घरकुले लवकरात लवकर पूर्ण करणेच्या सूचना सरपंच यांनी लाभार्थींना दिल्या तसेच या दिनी महिला सभा घेणेत येऊन महिलांना विविध विषयांची माहिती देण्यात आली.




पनवेल : भाजप अनुसुचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी जि.प.सदस्य अमित जाधव यांना वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : माजी जिल्हा परिषद सदस्य व भाजप अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अमित जाधव यांच्या वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवकर सरपंच आनंद ढवळे, विचुंबे गावचे सरपंच प्रमोद भिंगारकर, सुकापूर ग्रामपंचायतीचे सदस्य व उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष महेश पाटील, सुकापुर गावचे ज्येष्ठ नेते शशिकांत पाटील, नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा नेते पंढरीनाथ ठाकूर यांनी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.८) जागतिक महिला दिनानिमित्त वुमन डेव्हलपमेंट सेल व उद्योगता विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला.



आंतरराष्ट्रीय महिला दिन महिलांच्या हक्कांच्या चळवळीचे प्रतीक असून त्यांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हा दिवस पाळला जातो. तसेच सर्वत्र समाज उन्नत्ती घडवून आणायची असेल तर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने महिलांना स्थान मिळाले पाहिजे असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी केले व आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या दिवशी महाविद्यालयात ड्रेस अप टू नाइन्स सेलिब्रेटिंग वुमन या स्पर्धेच्या आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रातील आयकन्सच्या वेशभूषा करून त्यांनी कशा पद्धतीने यश संपादन केले याविषयी सादरीकरण केले.

या स्पर्धेतील तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले तसेच त्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे व स्पर्धेचे आयोजन प्रा. सोनी पांडे समन्वयक, वुमेन डेव्हलपमेंट सेल व प्रा. तनुजा सुमन समन्वयक, उद्योगता विकास समिती यांनी केली तसेच दोन्ही समितीतील इतर सर्व सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



पनवेल : प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २मध्ये मंजूर घरकुल लाभार्थी गीता गणपत भोईर यांच्या घराचे भूमिपूजन जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून करण्यात आले. या वेळी भाताणचे सरपंच तानाजी पाटील, उपसरपंच अरुणा गाताडे, ग्रामसेवक वंदना आहिरे, सदस्य दीपक ठाकूर, अरुण पाटील, बाळाराम मुकादम, रजनी मुकादम, अस्मिता काठावले, रसिका भोईर, कार्यकर्ते अनिक काठावले, किरण मुकादम, पांडुरंग भोईर आदी उपस्थित होते.

खास महिला दिनानिमित्त

# मराठीतील पाच लक्षवेधक अभिनेत्री

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



मराठी चित्रपटसृष्टीच्या गौरवशाली इतिहासात अनेक गुणी अष्टपैलू, गुणी अभिनेत्रींचा सहभाग आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट चित्रपटापासून ते रंगीत चित्रपटापर्यंत आणि सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते ओटीटी असा हा प्रवास आहे. या वाटचालीतील पाच अभिनेत्री निवडणे तुफान गर्दीच्या लोकल ट्रेनमध्ये शिरताच विंडो सीट मिळण्यासारखेच अवघड. या निवडीतून मराठी चित्रपटाच्या लक्षवेधक वाटचालीतील काही गोष्टींचा वेध घेण्याचा हा छोटासा प्रयत्न.

**सुलोचनादिदी**

'विठू माझा लेकूरवाळा' या मराठी चित्रपटाच्या सेटवरची ही गोष्ट! चित्रपटातील एका करुण प्रसंगाचे चित्रीकरण सुरू होते, देवाचा कंठा चोरण्याचा आळ जनाबाई (सुलोचनादिदी) यांच्यावर येतो. ती देवाच्या पुढ्यात येऊन चिडून देवाला खूप शिव्या घालते आणि आर्त किंकाळी मारते व तेथेच कोसळते...

कॅमेरा सुरू झाला, दृश्य सुरू झाले, पण सुलोचनादिदींनी या वेळी अशी काही किंकाळी मारली की त्यांचा तो आर्त स्वर सेटवर असलेल्या प्रत्येकाचे काळीज कापीत गेला. दृश्याचे शूटिंग संपले आणि या चित्रपटात नामदेवांची भूमिका साकारणारे अरुण सरनाईक पुढे येत सुलोचनादिदींच्या पायाला स्पर्श केला. सरनाईक यांचे डोळे पाणावले होते. ते दिदींना म्हणाले, बाई, आता जो अभिनय केलात त्याचं वर्णन करायला माझ्याकडे शब्द नाहीत...

सुलोचनादिदींना मिळालेली ही उत्कट दाद होती. 'सुलोचनादिदी' म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीचा एक चेहरा. रसिकांच्या किमान चार पिढ्या ओलांडूत त्यांनी अभिनय प्रवास केला. वात्सल्यमूर्ती हा एकच शब्द त्यांच्या कार्यकर्तृत्व आणि प्रतिमा यासाठी परफेक्ट ठरतो. सुलोचना यांचे मूळ नाव रंगू दीवाण. कोल्हापूरजवळच्या खडकलाट या खेड्यात त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना चित्रपट पाहण्याची विशेष आवड होती. मा. विनायक यांना एकेकाळी शिकवलेल्या शिक्षकांशी या रंगूच्या वडिलांचा परिचय होता. त्यांच्या ओळखीने रंगूला मा. विनायक यांच्या 'प्रफुल पिक्चर्स' या कंपनीत प्रवेश मिळाला. मा. विनायक यांनी रंगूला 'चिमुकला संसार' या चित्रपटात छोटीशी भूमिका दिली. प्रफुल्ल पिक्चर्सचा मुक्काम कोल्हापूरवरून मुंबईला हलला तेव्हा त्या कोल्हापुरातच भालजी पेंढारकर यांच्या प्रभाकर स्टुडिओत दाखल झाल्या. १९४६मध्ये प्रभाकर पिक्चर्सच्या 'सासूरवास' या चित्रपटात भूमिका साकारली, तर 'करीन ती पूर्व' या नाटकाच्या वेळी भालजीनी त्यांचे नाव 'सुलोचना' असे केले आणि मग १९४७ साली त्या 'जय भवानी' या चित्रपटात नायिका झाल्या आणि त्यांची अभिनेत्री म्हणून वाटचाल आकार घेऊ लागली. 'वहिनीच्या बांगड्या' या चित्रपटाच्या यशाने त्याना वहिनी आणि ताई अशी आदरयुक्त प्रतिमा प्राप्त झाली.

'प्रपंच'मध्ये गावातील एका कुंभारणीच्या भूमिकेसाठी सुलोचनादिदींना निर्मात्याकडून नेसण्यासाठी नवीन साड्या देण्यात आल्या, पण यामुळे ही भूमिका योग्य वठणार नाही असे वाटल्याने त्यांनी त्या साड्या गावातील गरीब बायकांना दिल्या आणि त्यांच्याकडील जुन्या, जीर्ण साड्या घेऊन त्या नेसल्या. यामुळेच आपण या चित्रपटातील व्यक्तिरेखेला न्याय देऊ शकू असा त्यांना विश्वास होता आणि झालेही तसेच. सुलोचनादिदींनी हिंदी चित्रपटातही खूप मोठ्या प्रमाणात भूमिका साकारल्या.

चिमणी पाखरं या मराठी चित्रपटाची 'नन्हे मुन्ने' या नावाने रिमेक निर्माण करण्यात आला. तो सुलोचना यांचा पहिला हिंदी चित्रपट होय. सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटात त्यांनी प्रामुख्याने चरित्र भूमिका साकारल्या.

प्रेषक आणि चित्रपट यापासून आपण वेगळे होऊच शकत नाही अशीच त्यांची भावना होती. सिनेमा, आपले गुरू आणि जनता जनार्दन यांनी आपणास मोठे केले, वैभव प्राप्त करुन दिले असे त्या मानत. या प्रवासात त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. भारत सरकारने त्यांना १९९९ साली पद्मश्री पुरस्काराने गौरवले. महाराष्ट्र शासनाने त्यांना १९७२ साली 'जस्टीस ऑफ पीस' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९९७ साली त्यांना व्ही. शांताराम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचे मराठी चित्रपटसृष्टीबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राला असलेले देणे मोठे आहे. त्यांची एकूणच दीर्घकालीन अभिनय वाटचाल पाहता त्यांना मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात यायला हवे होते.

**सीमा देव**

सीमा देव म्हणजे मराठी चित्रपटातही सोज्वळ, सौम्य (सोबर या अर्थाने) प्रतिमा आणि त्याच इमेजनुसार त्यांना प्रामुख्याने मिळालेल्या भूमिका. त्यांचे मूळ नाव 'नलिनी सराफ'. मुंबईत गिरगावातील बनाम लेन येथील दहा बाय चौदा अशा अगदी छोट्या जागेत तीन बहिणी आणि एका भावासोबत त्या रहात. वडील गोल्डन टोबॅको कंपनीत कामाला होते, पण अचानकपणे वडिलांचे छत्र लहान वयात हरवलेले आणि भावंडांची जबाबदारी अशा वेळी सीमा यांनी घरच्या आर्थिक गरजेतून चित्रपटात भूमिका साकारायला सुरुवात केली. तशा त्या शाळेत असताना योगेन्द्र देसाईंच्या बॅले ट्रूपमधून नृत्य करीत असत. त्या एका शोचे त्याना वीस रुपये मिळत. शनिवार रविवारी शो असला की ऐंशी रुपये मिळत. पन्नासच्या दशकात ही रक्कम खूपच आनंद देणारी होती. विशेष म्हणजे त्याच बॅले ट्रूपमध्ये त्यांच्याच वयाच्या आशा पारेखही नृत्यांगना होत्या. इब्राहिम नडियादवालांच्या 'अयोध्यापती' या हिंदी चित्रपटात बालवयीन सीतेच्या भूमिकेसाठी आशा पारेख यांची निवड झाली, त्याच चित्रपटात सीमा यांना बालवयातील उर्मिलेची भूमिका मिळाली. या चित्रपटात उषा किरण कैकयी झाल्या होत्या तर रत्नमाला सुमित्रेच्या भूमिकेत होत्या.

सीमा देव या रमेश देव यांना पहिल्यांदा भेटल्या, हा किस्सा खूप रंजक आहे. गोरेगावच्या फिल्मीस्तान स्टुडिओत जाण्यासाठी त्यांनी आपल्या आईसोबत चर्नी रोड येथे ट्रेन पकडली. पुढच्याच ग्रॅन्ट रोड स्टेशनवर रमेश देव यांनी नेमकी हीच ट्रेन पकडली आणि या दोघींच्या समोर येऊन ते बसले. सीमाताईंच्या आईना रमेश देव अभिनेता म्हणून अजिबात आवडत नव्हते. त्यामुळे या दोघींनी त्यांच्याकडे तसे फारसे लक्ष दिले नाही. गोरेगाव स्टेशनवर उतरल्यावर या दोघींना फिल्मीस्तान स्टुडिओत जाण्यासाठीचा रस्ता माहीत नव्हता. म्हणून त्यांनी रमेश देव यांच्या मागे मागे जाणे पसंत केले. फिल्मीस्तानच्या वतीने मराठी चित्रपटाची निर्मिती करण्यात येणार होती. म्हणून हे सगळे घडत होते. विशेष म्हणजे, सीमा यांना या चित्रपटात भूमिका मिळाली. योगायोग असा की या चित्रपटात ते बहीण भावाच्या भूमिकेत आहेत. हा चित्रपट होता 'आलिया भोगासी'! एका ज्योतिषाकडून सांगितले की, नलिनी यांचे चित्रपटासाठी 'स' आद्याक्षराने सुरू होणारे नाव ठेवा. ते भाग्यकारक राहिल. त्याच वेळेस गिरगावातील मॅजेस्टीक सिनेमात प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपटात नायिकेचे पडद्यावरचे नाव 'सीमा' होते. त्यावरून नलिनी यांचे नाव 'सीमा' असे झाले. दत्ता धर्माधिकारी दिग्दर्शित हा चित्रपट 'उसना नवरा' या नाटकावर आधारित होता. या चित्रपटात जयश्री गडकर आणि राजा गोसावी हे नायक नायिका होते. फिल्मीस्तानच्या पहिलं प्रेम, बोले तैसा न चाले (हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही) या चित्रपटात भूमिका साकारल्यावर त्यांनी फिल्मीस्तान सोडले. त्यानंतर त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. 'राजमान्य राजश्री' या चित्रपटात त्या सहनायिका म्हणून सर्वप्रथम चमकल्या. राजा परांजपे दिग्दर्शित 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटात त्यांनी साकारलेली अंध नायिकेची भूमिका रसिकांना खूप आवडली आणि त्या मराठी चित्रपटाच्या यशस्वी नायिका म्हणून गणल्या जाऊ लागल्या. राजा परांजपे यांना त्या आपल्या अभिनय क्षेत्रातील गुरू मानतात. राजा ठाकूर आणि मधुकर पाठक या दिग्दर्शकांचाही आपल्यावर प्रभाव आहे असे त्या आवर्जून सांगत.

मराठी चित्रपटात भूमिका साकारत असतानाच त्यांनी हिंदी चित्रपटातही भूमिका साकारल्या. 'भाभी की चुडिया' या चित्रपटात त्या भूमिका साकारत असताना निर्मात्यांनी त्यांना अगदीच साधी साडी नेसायला दिली असल्याचे चित्रपटाच्या नायिका मीनाकुमारी यांच्या लक्षात येताच त्या सीमा देव यांना आपल्या घरी घेऊन गेल्या आणि त्यांनी आपल्या भारी साडीतील साडी नेसायला दिली.

सीमा देव यांचा स्वतःचा अतिशय आवडता चित्रपट होता 'सुवासिनी'. या चित्रपटाची चित्रफित त्यांनी व्यवस्थित जपून ठेवली. कधी जुन्या आठवणीत रमण्यासाठी, तर कधी सहज म्हणूनही त्या हा चित्रपट पाहत. त्यांनी आपल्या अनुभव आणि आठवणींवर लिहिलेले 'सुवासिनी' हे आत्मचरित्र वाचनीय. पेंटींग आणि लिखाण या त्यांच्या अतिशय आवडत्या गोष्टी आहेत.

सी.पी. दीक्षित दिग्दर्शित 'गजब'मध्ये त्यांनी धर्मेंद्रच्या आईची भूमिका साकारली आणि त्यानंतर त्यांनी टी. रामाराव दिग्दर्शित 'मजबूर'मध्ये सनी देओलची आई साकारलीय. धर्मेंद्र प्रत्यक्षात त्यांच्यापेक्षा वयाने मोठा, तर सनी देओल साधारण अजिंक्य देवच्या वयाचा, पण दोन्ही भूमिकांना त्यांनी योग्य न्याय दिला. अशा चरित्र भूमिकेत वाटचाल करीत असतानाच 'रूप की रानी चोरो का राजा' (१९९३)मध्ये भूमिका साकारल्यावर त्यांना असे वाटले की आता पुरे झाले हे चित्रपटात भूमिका साकारणे. असा निर्णय घ्यायची त्यांच्यावर वेळ का आली? तर या चित्रपटातील त्यांची भूमिका अशा काही विचित्र पद्धतीने कापली गेली होती की त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखेला काहीच आकार अथवा अर्थ नव्हता. अशा निरर्थक भूमिका साकारत आपला वेळ वाया घालवण्यापेक्षा आपण आपल्या कुटुंबाला आणि आवडी निवडीला वेळ द्यावा असे वाटले. त्यात त्या छान रमल्या. नातवांसोबत खेळू लागल्या. याच काळात देव कुटुंबिय जुहूच्या मेघदूत या आपल्या निवासस्थानावरून वर्सोवा येथे राह्यला गेले आणि सीमाताई घरची सजावट आणि देवपूजा यात रमल्या. अनेक वर्षानी महेश कोठारे यांनी सीमाताईना 'दुभंग' या चित्रपटातील मुस्लिम व्यक्तिरेखेबाबत विचारले. अशा पद्धतीची भूमिका त्यांनी यापूर्वी कधीच साकारली नव्हती. त्यामुळे त्यांनी या भूमिकेला होकार दिला आणि पुन्हा त्या कॅमेरासमोर आल्या. त्याच वेळेस अमोल शेडगे दिग्दर्शित 'जेता'मध्ये त्यांनी भूमिका साकारत आपली यशस्वी वाटचाल कायम ठेवली.

**जयश्री गडकर**

आपल्या कर्तृत्वाने आपली गुणवत्ता सातत्याने अधोरेखित करणं म्हणजे काय असते हे जयश्री गडकर यांच्या कारकिर्दीवर 'फोकस' टाकताना पटकन लक्षात येते. अभिनय, नृत्य, सौंदर्य आणि मेहनत या गुणांवर जयश्री गडकर मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील अतिशय मानाचे स्थान प्राप्त केलेल्या अभिनेत्री ठरल्या. बालपणीपासूनच स्वप्न रंगवायला त्यांना विशेष आवडे. एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. कारवार जिल्ह्यातील सदाशिवगड तालुक्यातील कणसगिरी गावचा त्यांचा जन्म. वयाच्या पाचव्या वर्षी त्या मुंबईत आल्या. गिरगावातील खेतवाडीतील म्युनिसिपल शाळेत प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर राममोहन हायस्कूलमध्ये त्या दाखल झाल्या. शाळेत असतानाच त्या ललित कलांकडे आकर्षित झाल्या. हळूहळू शाळा, नृत्य आणि गायन क्लास सांभाळून त्या हौशी रंगभूमीवर वावरल्या. व्ही. शांताराम यांच्या राजकमल कलामंदिर स्टुडिओत त्या समूहात नाचू लागल्या. कोरसमध्ये गाऊ लागल्या आणि तेथेच त्यांचे नशीब उघडले. चित्रपती व्ही शांताराम यांच्या 'झनक झनक पायल बाजे' या १९५५ सालच्या चित्रपटात नायिका संध्या यांच्या मागे चक्क ग्रुप डान्समध्ये काम करून जयश्री गडकर यांच्या कारकिर्दीची सुरुवात झाली. इतक्या छोट्याशा संधीतून सुरुवात करून मग खूपच मोठी आणि यशस्वी वाटचाल आखणे अथवा घडवणे सोपे नाही, पण जयश्री गडकर यांनी ते सिद्ध आणि साध्य केले. त्याच वेळेस भारत भेटीवर आलेल्या बुल्गानिन या रशियन पाहुण्यांसमोर जयश्री गडकर यांनी सादर केलेल्या नृत्याचे फोटो राम देवताळे यांनी दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांना दाखवले. त्या फोटोतही जयश्री गडकर यांच्या नृत्य शैलीची ओळख झाली आणि पाटील यांनी आपल्या 'दिसतं तसं नसतं' या चित्रपटात राजा गोसावी यांच्यापुढे एक नृत्य करण्याची संधी दिली. जयश्री गडकर यांचे असे आणखी एक पाऊल पुढे पडले आणि त्यानंतर त्यांची पावले सतत पुढेच पडत राहिली. राजा परांजपे दिग्दर्शित 'गाठ पडली ठका ठका' या चित्रपटात त्यांना पहिल्यांदा महत्त्वाची भूमिका मिळाली. 'आलिया भोगासी' या चित्रपटापासून त्यांची नायिका म्हणून कारकीर्द सुरू झाली.

एकाच वेळेस भिन्न स्वरूपाच्या भूमिका हेदेखील जयश्री गडकर यांचे विशेष ठरले. त्यामुळे 'मानिनी'मध्ये त्यांनी सोज्वळ नायिका साकारली, तर 'रंगपंचमी'मध्ये तेवढ्याच ताकदीने तमासगिरीण साकारली.

पुणे शहरात एकदा दिलीपकुमार यांनी 'एक गाव बारा भानगडी' पाहिला आणि जयश्री गडकर यांच्याबद्दल गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, चांगला चित्रपट आहे. तो पाहताना वेळ कधी आणि कसा निघून गेला हे कळलचं नाही. रंजन करता करता बरंच काही सांगून जातो हा चित्रपट... दिलीपकुमारचे हे बोल जयश्री गडकर नेहमीच सांगत.

जयश्री गडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेताना अनेक महत्त्वाच्या मराठी चित्रपटांची नावे सांगता येतील. त्यांची नृत्यप्रधान भूमिका असलेल्या 'सांगत्ये ऐका' या चित्रपटाने १९५९ साली पुणे येथील विजयानंद चित्रपटगृहात तब्बल १३१ आठवड्यांचे घवघवीत यश संपादले आणि जयश्री गडकर स्टार झाल्या. त्यांनी काही हिंदी चित्रपटातही भूमिका साकारलीय.

अभिनेते बाळ धुरी यांच्याशी जयश्री गडकर यांचा १९७५ साली विवाह झाला. विशेष म्हणजे त्यांच्या या विवाहाची बातमी तेव्हा आघाडीच्या मराठी वृत्तपत्रांतून फोटोसह पहिल्या पानावर प्रसिद्ध झाली. लग्नानंतरही त्यांनी चित्रपटातून भूमिका साकारणे कायम ठेवले. रामानंद सागर यांच्या 'रामायण' या लोकप्रिय मालिकेत बाळ धुरी आणि जयश्री गडकर या दोघांनीही भूमिका साकारली. त्यांनी चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रातही पाऊल टाकले. त्यांच्यासाठी हा अनुभव वेगळाच होता.

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील आपल्या दीर्घकालीन अभिनय वाटचाल आणि अनुभव यावर त्यांनी आपले 'अशी मी जयश्री' हे आत्मचरित्र लिहिले. पत्रकार वसंत भालेकर यांनी त्याचे शब्दांकन केले, तर जयश्री गडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा त्यांचे सहकलाकार, निर्माते आणि दिग्दर्शक यांनी वेध घेतलेले 'नक्षत्रांचे लेणे' हे पुस्तक संग्रही ठेवण्याजोगे आहे. जयश्री गडकर यांनी रुपेरी पडद्यावर अनेक तरी सुपर हिट गाणी साकारली. गीत संगीत आणि नृत्यातून जयश्री गडकर यांनी मराठी चित्रपट रसिकांना भरभरून आनंद दिला.

**रंजना**

एक अष्टपैलू आणि मेहनती अभिनेत्री म्हणून रंजना देशमुख हे नाव घेतले जाते. रंजनाची आई वत्सलाबाई देशमुख या मराठी आणि गुजराती रंगभूमीवरील प्रथितयश अभिनेत्री होत. त्यांनी मराठी चित्रपटातही भूमिका साकारल्या. तर रंजना यांची मावशी संध्याजी यांनी नवरंग, पिंजरा अशा बहुचर्चित हिंदी आणि मराठी चित्रपटातून भूमिका साकारलीय. त्यामुळे लहानपणापासूनच रंजना यांच्यावर अभिनयाचे संस्कार होत गेले. चित्रपती व्ही शांताराम यांनी मराठीतील पहिला रंगीत चित्रपट 'इये मराठीचिये नगरी' या चित्रपटात बालतारका म्हणून रंजना यांना पहीली संधी दिली. संध्या या चित्रपटाच्या नायिका होत्या आणि त्यांच्या म्हणजेच आपल्या मावशीच्या बालपणीची भूमिका रंजना यांनी त्यात साकारलीय. १९६५ सालची ही गोष्ट आहे. तर १९७७ सालच्या राजकमल कलामंदिरच्या व्ही. शांताराम दिग्दर्शित 'चंदनाची चोळी अंग अंग जाळी' या चित्रपटापासून रंजना यांनी छोट्याशा पण महत्वाच्या भूमिकेने आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. या रंगीत तमाशाप्रधान चित्रपटात रंजना यांनी लंका नावाच्या मोलकरीणीची फर्मास भूमिका साकारली. ही लंका तशी कजाग, नाचरी, कडकलक्ष्मी. रंजनाची रुपेरी वाटचाल सुरु झाली. किरण शांताराम दिग्दर्शित 'झुंज', व्ही. शांताराम दिग्दर्शित 'चानी' आणि अनंत माने दिग्दर्शित 'असला नवरा नको गं बाई' असे त्यापाठोपाठच रंजनाचे महत्त्वाचे चित्रपट आले आणि रंजनाच्या अभिनय क्षमतेचा जबरदस्त प्रत्यय मराठी चित्रपटसृष्टी, रसिक प्रेक्षक आणि समिक्षकांना आला. 'रंजना नावाचे पर्व' आता सुरू झाले आणि मग सुरू झाला रंजनाच्या चित्रपटांचा झंझावात. जवळपास प्रत्येक दोन चित्रपट झाल्यावर रंजनाचा चित्रपट प्रदर्शित होत राहिला आणि रंजनाची अभिनेत्री म्हणून क्षमता दिसू लागली. १९७७ ते १९८४ अशा या काळातील रंजनाचे चित्रपट गाजले. यातील अनेक चित्रपटांनी त्या काळात मुंबई, पुणे, कोल्हापूर शहरात खणखणीत रौप्यमहोत्सवी यश संपादलय.

महत्त्वाचे म्हणजे रंजनाने कधीच स्वतःला एका चौकटीत अडकवले नाही. अथवा कोणत्याही प्रकारची भूमिका साकारण्यास त्या कचरल्या नाहीत. नागिण, अरे संसार संसार, दैवत या चित्रपटात रंजनाने युवा ते वृद्धा अशा वयाची भूमिका साकारलीय. कधी रंजनाने शिक्षिका साकारलीय, तर कधी तमाशाच्या बोर्डावरील नाची, तर कधी अगदी खलनायिकाही साकारलीय. कधी पारंपरिक मराठी कौटुंबिक चित्रपट, तर कधी धाडसी कथानक, कधी विनोदी, तर कधी अ‍ॅक्शनबाज भूमिका साकारलीय. अशी विविधता द्यायची तर तेवढे कष्ट घ्यायला हवे. 'चानी' साकारताना रंजनाने नारळाच्या झाडावर चढण्याचे कष्ट घेतले. याच भूमिकेसाठी पहाटे पाच वाजता उठून टेप केलेल्या संवादाचा सराव केला. रणजित देसाई यांच्या 'बारी' या कथेवर आधारित 'नागिण'मधली नागी रंगवतानाही रंजनाने खूप कष्ट घेतले. 'तमासगीर' या चित्रपटात उषा नाईकच्या आईची भूमिका साकारलीय. 'जखमी वाघीण' या चित्रपटातील तिची बानू थेट हातात बंदूक घेणारी, 'देवघर'मध्ये त्यानी सेवाभावी डॉक्टर साकारली. 'लक्ष्मी' या चित्रपटात जयमाला वकील साकारली. 'सुशीला'मध्ये पॉकेटमारी, थिएटरबाहेर सिनेमा तिकीटाची ब्लॅक मार्केटर ते देहविक्रय करणारी बिनधास्त युवती साकारली. सुशीला या चित्रपटातील नाची रंगवण्यापूर्वी रंजनाने लीला गांधी यांच्यासारख्या जाणकार नृत्यनिपुण अभिनेत्रींना घेऊन तमाशाच्या थिएटरमध्ये जाणे पसंत केले. तेथे दौलतजादा कसा वसूल होते ते अनुभवले. त्यामुळे ही भूमिका सकसपणे वठली. रंजना यांनी त्या काळातील मराठीतील सर्वच आघाडीच्या नायकांसोबत भूमिका साकारली. रवींद्र महाजनी, कुलदीप पवार, राजा गोसावी यांच्यासोबत अनेक चित्रपटांतून भूमिका साकारली, पण जास्त जोडी जमली ती अशोक सराफ यांच्यासोबत.

अशी अतिशय प्रभावीपणे आणि जोशात, उत्साहात, मनसोक्त वाटचाल सुरू असतानाच २२ नोव्हेंबर १९८४ रोजी एक मोठी दुःखद घटना घडली. शांतारामबापूंच्या 'झंझार' या चित्रपटाच्या आऊटडोअर शूटिंगसाठी जात असताना बंगलोरजवळ रंजना यांच्या गाडीला मोठा अपघात झाला. इतका मोठा की तब्बल चौदा महिने इस्पितळात उपचार घ्यावे लागले. सुरुवातीला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये आणि मग महालक्ष्मी हाजी अलीच्या एका इस्पितळात त्या उपचार घेत होत्या. शारीरिक धक्क्यासह हा भावनिक आणि मानसिक धक्काही होता. अनेक ऑपरेशन्स, इंजेक्शन, औषधे असा जणू एक न थांबणारा प्रवास सुरू राहिला, पण रंजनाचे आत्मबळ जबरदस्त होते. त्या हळूहळू बरे होत गेल्या तरी व्हीलचेअरवर बसणे नशिबी आले. विशेष म्हणजे थोडे बरे वाटल्यावर घरी आल्यावर रंजना यांनी 'हिचं काय चुकलं' या चित्रपटाचे डबिंग पूर्ण केले. अपघात होण्यापूर्वी या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले होते आणि याचे डबिंग राजकमल कलामंदिर स्टुडिओत व्हावे म्हणजे घरच्यासारखे वाटेल अशी रंजना यांची भावना होती. या काळात मराठी चित्रपटसृष्टीत एकूणच चिंतेचे वातावरण निर्माण झाले. एका झंझावातासारखा प्रवासात अनपेक्षितपणे खिळ बसली होती. स्पॉटबॉयपासून निर्मात्यांपर्यंत अनेक जण रंजना पुन्हा एकदा चित्रपटात भूमिका साकारण्यास सज्ज व्हाव्यात यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना करत होते. रंजना हळूहळू आपल्या परेल येथील घरात वावरू लागल्या, पण हालचालीवर बरीच बंधने होती. अशाच वेळी व्हीलचेअरवर असूनही अतिशय जिद्दीने त्यांनी 'फक्त एकदाच' या नाटकातून रंगभूमीवर पुनरागमन केले. अभिनयावर बेहद्द प्रेम असल्यानेच हे शक्य झाले. समीक्षक व प्रेक्षकांनी रंजना यांचे स्वागत केले. रंजना यांना सहानुभूती नको होती, तर त्यांना नाटक आणि चित्रपटात पुन्हा मन रमवायचे होते. या नाटकाचे काही प्रयोग झाले.

**स्मिता पाटील**

आपल्या अप्रतिम अभिनयाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करण्यात स्मिता पाटील यशस्वी ठरल्या. वडील शिवाजीराव पाटील हे महाराष्ट्रातील राजकारणातील मोठे प्रस्थ, तर आई विद्याताई पाटील सामाजिक सेवेत.

रूपेरी पडद्यावर भारतीय स्त्रीची पर्यायी प्रतिमा साकारणारी सक्षम अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील यांचे भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात वेगळं स्थान आहे. अल्पायुषी ठरलेल्या स्मिता पाटील यांनी विविध व्यक्तिरेखांच्या संवेदना व त्यांचं व्यक्तिमत्व इतक्या प्रभावीपणे आणि सूक्ष्म बारकाव्यांसह अभिव्यक्त केलं की त्यामुळे पडद्यावरील सौंदर्याच्या रुढ संकल्पना दुय्यम ठरल्या. राष्ट्र सेवादलाच्या सांस्कृतिक कार्यात सक्रिय असलेल्या स्मिताने १९७४ साली अरुण खोपकर यांच्या एफटीआयआयच्या 'तीव्र मध्यम' या डिप्लोमा फिल्ममध्ये सर्वप्रथम काम केले, तर दृकश्राव्य माध्यमाची सुरुवात दूरदर्शनवरील 'बातमीदार' या नात्याने केली. छोट्या पडद्यावरुन या भूमिकेवरुन तिचे सुप्त गुण हेरून श्याम बेनेगल या समर्थ दिग्दर्शकाने तिला 'निशांत' आणि 'चरणदास चोर' या चित्रपटात अभिनयाची संधी दिली.

अभिनेत्री म्हणून करिअर आकाराला येत जाताना स्मिता पाटील यांनी काही वेगळ्या जॉनरच्या मराठी चित्रपटात भूमिका साकारल्या. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित बहुचर्चित 'जैत रे जैत' आणि 'उंबरठा' (हाच चित्रपट हिंदीत 'सुबह' या नावाने निर्माण झाला), रामदास फुटाणे दिग्दर्शित 'सूत्रधार', चंद्रकांत जोशी दिग्दर्शित 'सूत्रधार' या चित्रपटांचा उल्लेख हवाच. 'उंबरठा'मध्ये स्मिता पाटीलने साकारलेली सुलभा महाजन ही स्त्री मुक्ती विचारांची स्त्री होती.

स्मिता पाटीलने आपल्या कारकिर्दीत समांतर चित्रपट अथवा न्यू वेव्ह चित्रपटात मोठ्या प्रमाणात भूमिका साकारल्या. समांतर अथवा कलात्मक चित्रपटात भूमिका साकारत असतानाच स्मिता पाटीलने निखिल सैनी दिग्दर्शित 'तजुर्बा'तून व्यावसायिक चित्रपटात पाऊल टाकले. तेथेही अनेक चित्रपटात भूमिका साकारली.

स्मिता पाटील आणि शबाना आझमी यांच्या गुणवत्तेची कायमच तुलना केली जाई. महेश भट्ट दिग्दर्शित 'अर्थ'मधील या दोघींचा अभिनयाचा सामना गाजला. श्याम बेनेगल दिग्दर्शित 'मंडी'मध्ये त्या दोघी पुन्हा एकमेकांसमोर आल्या. दोघींचेही समर्थक आपल्या अभिनेत्रीनेच अभिनयात बाजी मारली असे म्हणत.

स्मिता पाटील आणि पुरस्कार यांचे नाते अतिशय घट्ट आहे. काही उल्लेखनीय पुरस्कार सांगायचे तर 'जैत रे जैत'साठी महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार, 'भूमिका' आणि 'चक्र' या चित्रपटातील अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कार, याखेरीज राष्ट्रीय एकता पुरस्कार, आशीर्वाद अवॉर्ड, जायंटस अवॉर्ड असे स्मिता पाटीलने असंख्य पुरस्कार पटकावले.

हिंदी चित्रपटसृष्टीतील पदार्पणानंतर बेनेगल यांनीच दिग्दर्शित केलेल्या मंथन' आणि 'भूमिका' या चित्रपटातील तिच्या भूमिका गाजल्या. स्मिता पाटीलने मग मराठी, हिंदी, पंजाबी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम आणि तेलगू अशा एकूण आठ भाषांतील चित्रपटात भूमिका साकारलीय. तेवढं तिचं अनुभव विश्व विस्तारले. स्मिता पाटीलने निर्माते किशोर मिस्कीन यांच्या चंद्रवदन दिग्दर्शित 'राजा शिवछत्रपती' या चित्रपटात भूमिका साकारत तिने मराठी चित्रपटात भूमिका साकारायला सुरुवात केली. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित ' सामना ' या चित्रपटात या टोपीखाली दडलयं काय या गाण्यात डॉ. श्रीराम लागू यांच्या फ्लॅशबॅकमधील युवती त्यांनी साकारली. श्याम बेनेगल दिग्दर्शित 'मंथन'मधून स्मिताने सहकारी चळवळीत सक्रिय झालेल्या हरिजन स्त्रीच्या व्यक्तिरेखेमधील सळसळते चैतन्य, आक्रमकता आणि सचोटी याचा सशक्त आविष्कार केला. हंसा वाडकर या अभिनेत्रीच्या आत्मकथेवर आधारित श्याम बेनेगल दिग्दर्शित 'भूमिका'(१९७७)मधून त्यांनी पुरुषप्रधान संस्कृतीत शोषित ठरणाऱ्या स्त्रीच्या संवेदना प्रभावीपणे अभिव्यक्त केल्या. स्मिता पाटीलच्या उदयापूर्वी वहिदा रेहमान, नुतन, सुचित्रा सेन तसेच समकालीन शबाना आझमी यांनी या चाकोरीपलीकडल्या काही प्रतिमा उभ्या केल्या. स्मिता पाटीलने ही धारा आपल्या अभिनय सामर्थ्याने दृढ केली आणि पुढेही नेली. कॉस्टा गॅव्हारासससारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या दिग्दर्शकाने १९८४ साली फ्रान्समध्ये पॅरीस आणि ला रोशेल अशा दोन्ही ठिकाणी स्मिता पाटीलच्या चित्रपटांचे महोत्सव आयोजित केले. अशा प्रकारचा चित्रपट महोत्सव आयोजित केली जाणारी स्मिता पाटील आशियातील पहिली अभिनेत्री आहे. मॉन्ट्रियल येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात परीक्षक म्हणून काम करण्याचा बहुमान स्मिता पाटीलला मिळाला. १९८५ साली नैरोबी येथे झालेल्या जागतिक महिला परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी स्मिता पाटीलला मिळाली.

चित्रपटात भूमिका साकारत असतानाच स्मिता पाटीलने बीज आणि वासनाकांड या वेगळ्या प्रवाहातील तसेच 'छिन्न' या व्यावसायिक मराठी नाटकात भूमिका केलीय. विशेष म्हणजे अ‍ॅलेक पद्मसी दिग्दर्शित 'रिक्वेस्ट कॉन्सर्ट' या एकपात्री नाटकातही स्मिता पाटीलने अभिनय केला. या सगळ्या प्रवासात स्मिता पाटीलने विवाहित राज बब्बरशी लग्न केल्याने सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

मराठी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत नायिकांची भूमिका खूपच महत्त्वाची. त्यातील निवडक पाच अभिनेत्रीं वरचा हा फोकस. यांच्यासह प्रत्येक काळातील प्रत्येक अभिनेत्रीचा मराठी चित्रपटसृष्टीच्या यशस्वी वाटचालीत सहभाग आहे.

# रोह्यात वणव्याच्या घटनांमध्ये वाढ

## ठोस उपाययोजना करण्याची गरज

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात वनवे लागण्याचे प्रकार वाढले आहे त्याचा मोठा फटका इंद्रदेव धनगरवाडी येथे बसल्याचे दिसून आले. ५० च्या आसपास घरे, गोटे जळून खाक झाले. या घटनेची शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे. विशेषता या वनवाचा फटका जंगल भागा नजीक असलेल्या आंबा, काजू बागायतीने बसताना दिसत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान दरवर्षी वनवेमुळे होताना दिसत आहे.

नुकतेच गोवा येथे शेतकऱ्यांच्या बागायतीला वनव्याचा फटका बसल्याचा दिसून आला. झाडे जळून खाक झाली. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हे पेटणारे वनवे विजवण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

रोहा तालुक्यात मोठ्या प्रमाणात वनवे लागण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात निसर्गाचा ऱ्हास होत असताना वन प्राण्यांनाही त्याच्या झळ पोचत आहे. हा निसर्गाचा ऱ्हास थांबवण्याची आवश्यकता आहे. वनवे कशामुळे लागतात का मुद्दामहून कोणी पेटवतोय याचाही तपास अथवा शोध लागण्याची आवश्यकता आहे. शासन व वनखाते यावर उपाययोजना करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे. वनवे लागू नये यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.



### वृक्ष जळून खाक

*वनवे पेटू नये यासाठी अथवा वनवे लागू नये यासाठी वनविभाग व शासनाने खबरदारीचे उपाय योजनेची आवश्यकता आहे. गेली कित्येक वर्ष रोहा तालुक्यातील जंगलात लागलेल्या आगीमुळे मोठमोठे वृक्ष जळून खाक झाले आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम वातावरणात होताना दिसत आहे. यासाठी खबरदारी उपाय म्हणून* ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

रोहा तालुक्यात ठीक ठकाणी वनवे लागत असताना सामाजिक हेतूने काम करत असलेल्या निसर्ग वनजीव संवर्धन संस्थेच्या वतीने वनवे विजवण्यासाठी प्रयत्न केला जातो. निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था रायगड मधील तरुण–तरुणी माहिती मिळताच घटनास्थळीत जात स्थानिक व वनखात्यांच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वनवे विजानासाठी पुढाकार घेत असतात. आजपर्यंत रोहा तालुक्यातील अवचितगड, लक्ष्मीनगर, निडी, पिंगळसई, वांदोली, उडदवणे, मेढा, अशा अनेक गावातील जंगलामध्ये लागलेले किमान १३, ते १४ वणवे विझविण्यात संस्थेला यश आला आहे, परंतु त्यांच्याकडे पुरेशी वनवे योजनेसाठी सामग्री नाही ती उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. पुरेशी वणवे विझविण्याची सामुग्री नसताना ही वनवे भिजवण्यासाठी मोठे यश आले आहे.

या विभागात नेहमीच वणवे विझविण्यासाठी वनविभागाकडून रोहा तालुका वनपारिवेक्षक मनोज वाघमारे, मेढा विभाग वनधिकारी हंबीर भाऊ साहेब, ज्योती मिरगने, मुनिया मुल्ला यांचे त्यांना मोठे सहकार्य लाभत असते. ही संस्था अनेक वन्यजीव तसेच पाळीव जीव यांचे रक्षण करीत आहे. हे सर्व करण्यात प्रथमेश राक्षिकर, दत्ता वाघमारे, जागृत पाटील, संकेत हजारें, सनी जाधव, सुधीर मांझी, प्रणय जाधव, तेजस बोथरे, अभिषेक चौलकर, अमित, पूर्वा मळेकर, जागृती सुर्वे, लिंगामा पुजारी, सुरज भोईर, अमेय कराळे, गुरुकेश चावरेकर, वसंत डोलकर, विघ्नेश वाघमारे, प्रतीक दाभाडे, नम्रता जाधव, दीपक कोल्हटकर यांसर्वांचे खुप मोठे मोलाचे मिळत असते.

# घोडीवलीत ट्रान्सफॉर्मरचा पोल धोकादायक अवस्थेत

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील घोडीवली गावात असणाऱ्या व्यायामशाळेच्या शेजारील ट्रान्सफॉर्मरचा पोल धोकादायक अवस्थेत उभा असून या पोलमुळे धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे या ट्रान्सफॉर्मरच्या पोलची बदली करावी, अशी मागणी घोडीवली ग्रामस्थ करत आहेत.

घोडीवली गावातील व्यायामशाळेत शेजारी असणाऱ्या ट्रान्सफॉर्मरचा पोल धोकादायक अवस्थेत उभा असल्याने हा पोल केव्हाही पडून याठिकाणी मोठी दुर्घटना घडू शकते, त्यामुळे येथील रहिवासी भीतीच्या सावटाखाली वावरत असताना या पोलची तात्काळ बदली करावी यासाठी



महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडे मागणी करत असताना ही मागणी लवकरात लवकर मार्गी न लागल्यास याठिकाणी मोठी दुर्घटना घडून मोठ्या नुकसानीला येथील ग्रामस्थांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे तात्काळ याठिकाणी पोल बदलावे अशी मागणी घोडीवली ग्रामस्थांनी केली आहे, तर पोल न बदलल्यास होणाऱ्या अपघाताला सर्वस्वी महावितरण जबाबदार असेल, असे मत घोडीवली ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

व्यायाम शाळा व माझ्या घराच्या मधोमध असणाऱ्या ट्रान्सफॉर्मरच्या पोल धोकादायक अवस्थेत असून तो सडलेला असल्याने हा पोल केव्हाही कोसळू शकतो, त्यामुळे याठिकाणी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे तात्काळ महावितरणने हा पोल बदलाव, असे घोडीवली ग्रामस्थ चंद्रकांत नथु पिंगळे यांनी सांगितले.

# महिला दिनानिमित्ताने घरकुल योजनेचा शुभारंभ

**चौक : प्रतिनिधी**

जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून ग्रुप ग्रामपंचायत चावणी येथे महिलांसाठी घरकुल योजनेचा शुभारंभ करण्यात आला, विशेष म्हणजे याचा शुभारंभ देखील महिलांनी केला.

महिला प्रधानमंत्री आवास योजना व पी.एम. जनमन योजना अंतर्गत ग्रामपंचायत चावनी हद्दीमध्ये घरकुलांचे भूमिपूजनाचा कार्यक्रम जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने घरकुल भूमिपूजन सोहळा झाला.

अनेक लाभार्थी आजही बीपीएल यादीतील आहेत. अनेकांच्या डोक्यावर आजदेखील छप्पर नाहीत, त्यामुळे या घरकुल योजनेच्या माध्यमातून उभी राहत असलेल्या घरांचा दर्जा चांगल्या पद्धतीने देण्यात येईल. कार्यक्रमास ग्रामपंचायत अधिकारी अविनाश पिंपळकर यांच्या बरोबर ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ग्रुप ग्रामपंचायत कलोते यांच्या वतीनेही जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी विविध सामाजिक कार्यक्रम व उपक्रम सुरू करण्यात



आले, त्याचा शुभारंभ सहायक गटविकास अधिकारी राजपूत यांच्या हस्ते करण्यात आला.

घरकुल भूमिपूजनाचा कार्यक्रम व नवीन घरकुल योजनेचा शुभारंभ भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे सुधीर ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी सहायक गटविकास अधिकारी राजपूत, रजपूत, ग्रामविकास विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, ग्रामपंचायत अधिकारी निलेश म्हसकर यांच्यासह ग्रामपंचायत माजी सरपंच, उप सरपंच, सदस्य, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## निवडक

### विठ्ठल रखुमाई मंदिराचा जीर्णोद्धार



**खोपोली :** आंबिवली येथे असलेले विठ्ठल रखुमाई मंदिर जिर्ण झाल्यामुळे या देवाळाचा जिर्णोधार करून पुन्हा नव्याने बांधण्यांत आले.आज या शुभ मुहुर्तावर पुजा होम, अभिषेक आणी मंत्र घोष व धार्मिक विधीच्या माध्यमातून आंबिवली येथे या मुर्तीची प्राण प्रतिष्ठापना करण्यांत आली. पहाटेपासून या ठिकाणी मंगलमय वातावरण असल्यांचे पहावयांस मिळाले. या ठिकाणी विठ्ठल रखुमाई यांची सुंदर अशी रांगोळी रेखाटण्यांत आली तसेच येथील मंदिर फुलांनी सजविण्यांत आल्यांचे पहावयांस मिळाले. आज या मंदिरात मुर्तीची प्राण प्रतिष्ठापना होत असल्यामुळे सर्वत्र ठिकाणी आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. त्याच भजन किर्तन असे या कार्यक्रमाचे स्वरुप या ठिकाणी पहावयांस मिळाले.

### सायराबानू चौगुले यांना पुरस्कार

**माणगाव :** मातृसेवा फाउंडेशन ठाणे व साप्ताहिक शिक्षक ध्येय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनामित्त आयोजित



राज्यस्तरीय स्पर्धेत माणगाव येथील उपक्रमशील तथा सामाजिक, शैक्षणिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या कवयत्री, लेखिका व शिक्षिका सायराबानू वजीर चौगुले यांना राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षिका सायराबानू चौगुले या उत्तम कवयत्री व लेखिका आहेत. शिक्षिका म्हणून काम करताना त्या विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण देऊन घडवीत असतात. त्यांच्या कार्याची दखल उपरोक्त संस्थेने घेऊन त्यांना राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला पुरस्कार २०२५ने सन्मानित केले.

# न्यू बॉम्बे पेपर मिलला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली पेण मार्गांवरील वावोशी पोलीस दुर क्षेत्र हद्दीतील जांभीवली येथील न्यू बॉम्बे पेपर मिलच्या कच्च्या माल गोदामाला अचानक आग लागली. आगीचे रौद्ररूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलीस घटनास्थळी दाखल होत अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण केले.

खोपोली अग्निशमन दल, टाटा स्टील. औद्योगिक वसाहतीमधील चार बम्ब



व अलाना कंपनीची फायर ब्रिगेड टिम घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी जिकीरीचे प्रयत्न केले. २ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. या आगीत कच्चा माल व इमरतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी कोणत्याही प्रकारची जीवीत हानी झाली नाही.

# पोषण आहारात काम करणाऱ्या महिलांचा सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना रोज सकाळी माध्यान्ह भोजन देणाऱ्या सर्व कष्टकरी महिलांचा सत्कार श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव तर्फे करण्यात आला. यावेळी या कष्ठकरी महिलांना मुख्याध्यापक अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

या वेळी महिला दिन साजरा करण्यासाठी शाळेतील विद्यार्थिनी विविध वेशभूषा करून त्या पात्राचे सादरीकरण केले तसेच विविध समूह गीत, नृत्य घेण्यात आले. शिक्षक संघाचे सहसचिव सुमती तळेकर,सदस्य



भणगे, शिक्षक सचिव निशा बिरवाडकर मॅडम, सर्व शिक्षिका यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी या शाळेचे शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील व शिक्षक सागर राऊत, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वरा मोरे व आभार प्रदर्शन संस्कृती मिठागरी यांनी केले.

# खोपोली बाजारपेठेतील रस्ता रुंदीकरणास विरोध

**खोपोली :** येथील मुख्य बाजारपेठेतील रस्ता रुंदीकरणास भाजपाच्या माजी नगरसेविका अनिता शहा यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.

नगर परिषदेच्या ११ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखड्यात बाजारपेठेतील १२ मीटर ऐवजी १८ मीटर रस्ता रुंदीकरण करण्यात येण्याबाबत नगर रचना विभागाच्या प्रारूप विकास आराखड्यात नमूद आहे, त्यास अनिता शाह यांनी हरकत घेताना बाजारपेठेतील हनुमान मंदिर व जैन मंदिर ही पवित्र स्थान रस्ता रुंदीकरणत येत असल्याने जनतेच्या धार्मिक भावना दुखावण्याचा शक्यता आहे. १८ मीटर लांबीचा नियोजित रस्ता भर वस्तीत असलेल्या क्षेत्रातून जाणार असल्याने त्याचा येथील स्थानिक व्यापारी व नागरिकांना त्रास होणार आहे. त्यांचे कोट्यवधी रुपयांचे नकसान होणार असल्याने नगर परिषदेने १८ मीटर ऐवजी १८ मीटर पूर्वीचा रस्ता आहे तोच ठेवण्यात यावा, अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, या निवेदनाच्या प्रती रायगड जिल्हाधिकारी व तहसीलदार खालापूर यांनाही पाठविण्यास आल्याचे शहा यांनी सांगितले.

दरम्यान, याच विषयाबाबत बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची बैठक झाल्याचे वृत्त आहे त्यात व्यापारी या नियोजित रस्त्याला विरोध करणार असल्याची माहिती मिळत आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात सुट्ट्या पैशांचा तुटवडा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यामध्ये मागील काही दिवसांपासून सुट्ट्या पैशांचा व नाण्यांचा खूप मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवत आहे. १०, २०, ५० रुपयांच्या नोटांचा खूप मोठ्या प्रमाणात तुटवडा आहे.

बाजारात सुट्टे पैसे मिळत नसल्यामुळे अनेक दुकानदार किंवा व्यापारी आपापले खाते असलेल्या बँकांमध्ये सुट्टे पैसे आणण्यासाठी जातात, परंतु बँकेकडून पुरवठा करण्यात येणारे पैसेदेखील अत्यंत खराब दर्जाच्या नोटा असल्याने दुकानात येणारे गिऱ्हाईक या नोटा स्वीकारत नाही.

दहा रुपयाच्या व वीस रुपयांच्या नोटा अत्यंत खराब असल्याकारणाने त्या नोटांच्या बंडलला रबर देखील लावणे कठीण होऊन बसते.

कारण दुकानात येणारे बहुतांश गिऱ्हाईक ५०० किंवा १००च्या नोटा देत असल्याने ग्राहकांना परत देण्यासाठी सुट्या पैशांची उपलब्धता करणे व्यापाऱ्यांना कठीण होऊन बसत आहे. तरी श्रीवर्धन शहरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांनी आपापल्या असलेल्या गिऱ्हाईकांना चांगल्या दर्जाच्या नोटांचा पुरवठा करावा व सुट्ट्या नाण्यांचादेखील पुरवठा करावा, अशी मागणी व्यापारी वर्गातून केली जात आहे.

# माणगावमध्ये सौरऊर्जा दिव्यांचे मोफत वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात आदिवासी समाजातील २२ गावांसाठी एक हजार ४६६ आदिवासी बांधवांना सौर ऊर्जा दिव्यांचे मोफत वाटप करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या इंधन आणि वायू समितीच्या अध्यक्षपदी असल्याने त्याचा फायदा सामान्य माणसाला मिळण्यासाठी प्रयत्न करत आहे. हे सौर ऊर्जा दिवे भारत सरकारच्या ओएनजीसी या कंपनीच्या सामाजिक माध्यमांतून मोफत देण्यात आले आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे, अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

आदिवासी समाजातील बांधवांचे समाज जीवन उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या विकास योजना राबवून त्यांच्या जीवनात विकासाची उर्जा पुरवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. त्यांचे जीवन अधिक प्रकाशमान करणार आहे, असे आश्वासन माणगाव येथील कुणबी भवन येथे खासदार सुनील तटकरे यांनी आदिवासी समाजातील बांधवांना सौर ऊर्जा दिव्यांचे मोफत वाटप करताना दिले.

या वेळी कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुका अध्यक्ष काका नवगणे, चंद्रशेखर देशमुख, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, गणेगाव सरपंच राजेंद्र शिर्के, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर, शैलेश भोनकर, नगरसेवक, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.



# सुडकोली येथे आनंददायी बाल मेळावा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र सुडकोली येथे संतोष शेडगे साहेब उपशिक्षणाधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्या उपस्थितीत सह्याद्रीच्या कुशीत निसर्गाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात आनंददायी बाल मेळावा करण्यात आला

बुधवारी श्री नामदेव तांबडकर फार्म हाऊस सुडकोली येथे दहा शाळा तील १६१विद्यार्थी त्याचप्रमाणे सर्व शिक्षक मोठ्या प्रमाणात पालक व ग्रामस्थ यांच्या समक्ष मान्यवर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन कार्यक्रम झाला. त्याचप्रमाणे लाठीकाठी, लेझीम पथक, मूल्यासंवर्धनात्मक कार्यक्रम, संगीत खुर्ची व्यक्तिमत्व विकास अंतर्गत वेगवेगळे कार्यक्रम, घेऊन विद्यार्थ्यांना मध्ये नवचैतन्य निर्माण कले. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

बाल मेळाव्याचे औचित्य साधून केंद्रस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मनोहर महादेव पाटील मुख्याध्यापक शाळा सुडकोली यांना देऊन त्यांचा सह पत्नी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे तर दिप प्रज्वलन सुडकोली सरपंच प्रीती तांबडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्व विद्यार्थी शिक्षक पालक पदाधिकारी यांच्यासाठी अल्पोपहारचहा पाणी आणि उत्तम भोजनाची व्यवस्था सर्व शिक्षक वर्ग आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आली.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक **१. श्री. दिपक दौलतराम सोहंदानी २. सौ. रिती दिपक सोहंदानी** यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, तावेकव्जातील व वहिवाटीतील मिळकत असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्कावावत खात्री करून घेण्याकरीता पस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पाटनोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गट कमांक व उपविभाग | भूधारणा पध्दती भोगवटदार वर्ग | क्षेत्रफळ | | आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | हेक्टर | आर | रू. | पै. |
| २०/३ | १ | ०–१०–१० | | १ | ६२ |
| | पोटखराबा | ०–००–०० | | | |
| | **एकुण** | ०–१०–१० | | १ | ६२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार –मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दवादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड. संगम राम घरत**
बी.ए. एल. एल. बी.

पत्ता :– फ्लॅट नं. ४०१ व ४०२, चौथा मजला, ओम साई विल्डिंग, प्लॉट नं. १०१/३, गार्डन हॉटेल जवळ, सायन पनवेल हायवेच्या बाजुला, जुना ठाणा नाका, पनवेल, जिल्हा रायगड ४१० २०६
Cont. No. ७७३८७००७०८

# नवी मुंबईत सुशोभिकरणाकडे विशेष लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेमध्ये आघाडीवर असणाऱ्या नवी मुंबई शहराने सुशोभिकरणालाही तितकेच महत्त्व दिले आहे. या अंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा तसेच वर्दळीच्या जागा, प्रमुख चौक, दर्शनी भाग अशा विविध ठिकाणी आकर्षक चित्रभिंती रंगवून, शिल्पाकृतींची नवरचना करून, रस्ते दुभाजकांची रंगरंगोटी करुन शहराला सुंदरतेचा साज चढविला जात आहे.



महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बेलापूर ते दिघा अशा आठही विभागांमध्ये लक्षवेधी रंगसंगतीव्दारे चित्रभिंतीं सजविल्या जात आहेत. त्यावर विविध जनजागृतीपर संदेश सुलेखनाद्वारे रेखाटून स्वच्छता, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण याविषयी जागरुकता निर्माण केली जात आहे. यामध्ये ज्याठिकाणी यापूर्वी काढलेली चित्रे सुस्थितीत आहेत त्यावर पाणी मारुन ती धुवून घेतली जात आहेत. विशेष म्हणजे ती धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या ऐवजी प्रक्रीयाकृत पाण्याचा वापर केला जात आहे. विशेषत्वाने शहरातील मुख्यरस्ते व वर्दळीची ठिकाणे येथे मोठया प्रमाणात लोकांची रहदारी असल्याने अशा ठिकाणच्या सुशोभिकरणावर विशेष भर देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रस्त्यांशेजारील पदपथांचे कर्बस्टोन आणि दुभाजकांचे कर्बस्टोन यांचीही वाहतूक नियमानुसार पिवळया - काळया रंगात रंगरंगोटी केली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी चौकांमध्ये बसविण्यात आलेल्या आकर्षक शिल्पाकृतींची डागडुजी करण्यात येत असून आवश्यक तेथे शिल्पांना रंगरंगोटीही करण्यात येत आहे. या शिल्पाकृतींमधील अनेक शिल्पाकृती हया टाकाऊ पासून टिकाऊ संकल्पनेनुसार बनविण्यात आल्या असून त्याही सुव्यवस्थित करुन घेण्यात येत आहेत. तसेच दिशादर्शक फलकांचीही दुरुस्ती केली जात आहे. चौकांमधील कारंज्याचीही आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत असून त्यासाठी वापरले जाणारे प्रक्रीयाकृत पाणी नियमीत सुरु राहील याचीही काळजी घेतली जात आहे.

**शहराला सुंदरतेचा साज**

*अशा प्रकारे स्वच्छतेप्रमाणेच शहर सुशोभिकरणाकडे विशेष लक्ष दिले जात असून विविध रंगसंगतीने सजलेले नवी मुंबई शहर आता अधिकच सुंदर दिसू लागल्याने नवी मुंबईकर नागरिकांप्रमाणेच शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या प्रवाशांकडून व पर्यटकांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे.*

नागरिकांनी आपल्याकडील नको असलेल्या वस्तू दयाव्यात व ज्यांना अशा वस्तूंची गरज आहे त्यांनी त्या तेथून घ्याव्यात याकरिता नवी मुंबईत ९२ ठिकाणी थ्री आर सेंटर्स उभारण्यात आले असून त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मानवतेचे देणे-घेणे या संकल्पनेनुसार ९२ इतक्या मोठया संख्येने सुरु असलेल्या या थ्री आर सेंटर्सची आवश्यकतेनुसार दुरुस्ती व पुनर्रचना करण्यात येत आहे.

## राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणारे सावरकर एकमेवाद्वितीय -रवींद्र नेने




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर एकमेवाद्वितीय असल्याचे प्रतिपादन स्वा. सावरकर यांचे अभ्यासक रवींद्र नेने यांनी वाशी येथे एका कार्यक्रमात केले.

मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ आणि प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्ताने जयोस्तुते या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात मराठी साहित्य संस्कृती आणि कला मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी आणि वसंत आजगावकर यांनी स्वा. सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

ज्येष्ठ गायक संगीतकार वसंत आजगावकर, त्यांचे सुपुत्र व गायक निनाद आणि निनाद यांची कन्या निरजा अशा तीन पिढ्यांनी संगीतमय स्मरणगाथा सादर केली. याची संकल्पना आणि लेखन प्रभाकर अत्रे यांचे होते. मिलिंद परांजपे, कौस्तुभ दिवेकर, व्यंकटेश कुलकर्णी, मकरंद नाईक आणि शाश्वती आजगांवकर यांनी कोर्स आणि विविध सुमधुर वाद्यांच्या माध्यमातून साथ दिली.



**पनवेल : भारतीय मजदूर महासंघाच्या राष्ट्रीय कोषाध्यक्षपदी सुधीर घरत यांची नुकतीच निवड झाली. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

## महिला दिनानिमित्त विविध उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि रोटरी पर्यावरण कमिटी यांच्या संयुक्त विद्यमानाने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित पर्यावरण जनजागृती म्हणून मोहोपाडा अचानक मैदानावरून महिलांनी बाईक रॅली काढली.

या वेळी सरपंच उमा मुंढे आणि पाताळगंगा नदी व पर्यावरण संस्थेचे अध्यक्ष अरुण जाधव, रेश्मा कुरुप, दिपिका भंडारकर यांनी झेंडा उंचावतात बाईक रॅलीला सुरुवात झाली. ही बाईक रॅली मोहोपाडा दांड हून पुन्हा मोहोपाडा अशी आठ किमी काढण्यात आली यानंतर माझी वसुंधरा ५.० अंतर्गत प्लास्टिक बंदी म्हणून मोहापाडा बाजार पेठेत कापडी बॅग वाटप करण्यात आल्या.यावेळी बाजारहाट करण्यासाठी आलेल्या नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.



यानंतर उपस्थित महिलांनी केक कापून महिला दिन साजरा केला. या वेळी वासांबे मोहापाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे, दीपिका भंडारकर, माजी रोटरी क्लब अध्यक्ष रेश्मा कुरूप, अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच असंख्य महिला उपस्थित होत्या.

## मृतदेह आढळला

**पनवेल :** एनआरआय सागरी (उलवे) पोलीस ठाणे हद्दीत अनोळखी बेवारस पुरुषाचा मृतदेह आढळला आहे. मृताचे वर्णन अनोळखी हिंदू पुरुष, वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष, उंची ५.३ इंच, रंग सावळा, केस काळे, नाक लहान, दाढी पांढरी लहान, काळा टी शर्ट, काळी पॅन्ट आणि पॅन्टच्या खिशात स्टिलची चावी व कमरेस काळा धागा बांधलेला. या व्यक्तीला ओळख असल्यास त्यांनी तपास अधिकारी (८६६९७८९१००) किंवा उलवे पोलीस ठाणे (८६०००८८६९) यांच्याशी संपर्क साधावा.

# नारिशक्तीला सलाम!

***एकेकाळी चूल आणि मूल या संकल्पनेत अडकलेल्या महिला, मुली शिकल्या. स्वकर्तृत्वावर महिला विविध क्षेत्रांत प्रगती करीत आहेत. जागतिक महिला दिन सर्वत्र उत्साहात साजरा झाला. या दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांच्या कामगिरीचा आढावा दै. रामप्रहरने घेतला.***

## महिलांसाठी उपक्रम राबविणाऱ्या प्रतिभा घावरे



माथेरानमधील भारतीय जनता पक्षाच्या जेष्ठ कार्यकर्त्या तथा पदाधिकारी प्रतिभा प्रदिप घावरे यांनी माथेरान नगर परिषदेमध्ये दोन वेळा नगरसेवक पद व एकदा उपनगराध्यक्षा पद भूषविले आहे. आपल्या उपनागराध्यक्षा पदाच्या काळात त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून माथेरानमधील गरजवंत महिलांसाठी रोजगार निर्मिती करून दिली.

माथेरान शहर हे एक जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असल्याने या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांसाठी बचत गटांच्या माध्यमातून फूड फेस्टिवलचे सुद्धा आयोजन केले होते. यामधून येथील महिलांना रोजगार निर्मिती होऊ लागली. महिलांसाठी नगर परिषदेच्या माध्यमातून अनेक प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. यामध्ये पाककला, शिवणकाम तसेच बेकरी प्रोडक्ट बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे येथील महिलांना नवनवीन गोष्टी येथे शिकण्यास मिळाल्या. या प्रशिक्षण शिबिरांमुळे माथेरान मधील अनेक महिला आता स्वतःचे गृहउद्योग करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. राजकारण करीत असताना आपल्या गावातील महिलांसाठी प्रत्येकवेळी नवनवीन उपक्रम राबिविण्याचे काम प्रतिभा घावरे यांनी केले आहे. माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये देखील त्यांनी अनेक वर्ष काम केले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या तालुका स्तरीय पदावर काम करताना माथेरान साठी काही तरी नवीन संकल्प त्या करताना दिसत असतात. आता त्या क्षत्रिय मराठा समाज महिला अध्यक्ष माथेरान पदावर काम करीत आहेत.

महिलांच्या उन्नतीसाठी सतत झटत असणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्या तथा पदाधिकारी प्रतिभा घावरेया कर्तृत्ववान महिलेला महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा व त्यांच्या कार्याला सलाम!

**-संतोष खाडे**, माथेरान

## विद्यार्थ्यांची उन्नती साधणाऱ्या शोभा देशमुख




स्नेहल महिला मंडळ चौकमध्ये गेली ४०वर्षे सदस्य, अध्यक्षा व सध्या सल्लागार म्हणून कार्यरत आहे. खालापूर तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीवर महिला प्रतिनिधी म्हणून १२ वर्ष काम केले आहे. विद्या प्रसारिणी सभा चौक या संस्थेत कार्याध्यक्ष या पदावर सध्या कार्यरत आहे.

यशवंतराव देशमुख स्मृती समिती तर्फे गेली ३४ वर्षे अध्यक्षा म्हणून काम करतांना खालापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा यशस्वीपणे आयोजित करीत आहोत. या माध्यमातून चौकमध्ये महाराष्ट्रांतील नामवंत लेखक, कवी, नाटककार यांची व्याख्याने आयोजित करून विद्यार्थ्यांना साहित्य क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचा सहवास घडविला आहे.

शैक्षणिक क्षेत्रांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी नवनवीन प्रयोग करून शिक्षणाचा स्तर उंचविण्याचा प्रयत्न केला आहे. महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविले तसेच महिला व युवा वर्गासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली आहेत.

**-अर्जुन कदम**, चौक

## आपत्तीग्रस्तांचा बचाव करणाऱ्या सरिता मनवर




ठाणे जिल्ह्यातील तलासरी येथे असताना मध्यरात्री पेट्रोलिन करताना अचानक मेसेज आला, ग्रामस्थ पुराच्या पाण्यात अडकले आहेत, तातडीने बचाव करा! क्षणाचाही वेळ न दवडता पूरग्रस्त ठिकाणी पोहचले असता रात्रीच्या अंधारात दिसलेले चित्र आजही अंगावर काटा उभा करते. असे खालापूर पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक सरिता भीमराव मनवर सांगत होत्या.

सद्या खालापूर पोलीस ठाण्यात महिला पोलीस उपनिरीक्षक सरिता भिमराव मनवर कार्यरत आहेत, त्यांनी त्यांच्या कारकिर्दीतील काही प्रसंग सांगितले. धो धो पडणारा पाऊस, मध्य रात्र डोळ्याने न दिसणारे समोरचे दृश्य, सोबत दोन सहकारी एक चालक यांच्या बरोबर पाण्यातून मार्ग काढत अखेर ग्रामस्थ यांच्याशी संपर्क साधला, बायका लहान मुलांचा आक्रोश सुरू होता, बचाव कार्य करीत असताना प्रत्येक माणसाला धीर देत सुरक्षित ठिकाणी सर्वांना ठेवण्यात आले. हे बचाव कार्य करीत असताना रात्र कधी संपली हे कळले नव्हते, माझ्या वरिष्ठांनी याची दखल घेऊन माझा सन्मान केला.

लहानपणापासूनच पोलीस होण्याचे माझे स्वप्न होते, आणि त्याच दिशेने मी शालेय अभ्यास सुरू ठेवला होता. २०१० साली पदवी मिळाली.२ ०१३ साली पोलीस उप निरीक्षक पदाची भरती संदर्भात जाहिरात आली, दोन वर्षे अभ्यास केल्यावर मी सन २०१५ साली नाशिक येथे प्रशिक्षण घेण्यास दाखल होऊन प्रशिक्षण पूर्ण केले. रायगड जिल्ह्यातील खालापूर येथे दाखल झाल्यावर अचानक रात्री इर्शाळवाडी दुर्घटनेची बातमी धडकली आणि या भयाण रात्री इर्शाळवाडीचा डोंगर चढून तेथील परिस्थितीचे भयाण वास्तव समोर बघितल्यावर जीवितांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना कंटेनर हाऊस येथे सर्वांचे स्थलांतर होईपर्यंत २४ तास अविरत संवाद सुरू ठेवले.

**-अर्जुन कदम**, चौक

## रायगडची हिरकणी, जिगरबाज तरुणी श्वेता विश्वकर्मा



रायगड जिल्ह्यातील एक जिगरबाज तरुणी श्वेता रेखा संतोष विश्वकर्मा जिने आपल्या धैर्य, कौशल्य व समर्पणाने जीवाची बाजी लावून असंख्य मोहिमा आणि बचाव कार्यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याशिवाय अनेक वन्यजीवांचे प्राणदेखील वाचविले आहेत. तिला रायगडची हिरकणी या उपमेने गौरवण्यात आले आहे.


श्वेता विश्वकर्मा सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था (SVRSS) या संस्थेची सदस्या आहे. श्वेताला लहानपणापासूनच वन्यजीव आणि बचाव कार्यांमध्ये रस आहे. तीला काका शरणाप्पा ऐवाळे यांच्याकडून बिनविषारी साप हाताळण्याचे प्रशिक्षण मिळाले. वन्यजीव रक्षक सागर दहिंबेकर यांच्याकडून माउंटनिंग, वॉटर रेस्क्यू, फायर सेफ्टी, इंडस्ट्रियल फायर, फर्स्ट एड आणि आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळाले. ज्या माध्यमातून ती अनेक मोहिमा व बचाव कार्यामध्ये महत्त्वाची धाडसी भूमिका बजावत आहे.

श्वेताने महाड औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातील अपघातात ११ जणांचे जीव वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. श्वेताने साडेतीनशेहून अधिक रस्ते अपघातांमध्ये जखमी लोकांना मदत केली आहे. नदी, उंच कडे, रस्ते अपघात व पूर आदी घटनांमध्ये शेकडो मृतदेह बाहेर काढण्याचे काम तिने ने डगमगता केले आहे. माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी रायगडची हिरकणी, अशी उपमा दिली.

श्वेता अनेक नवीन युवतींना बचाव कार्याचे प्रशिक्षण देत आहे. विविध माध्यमातून युवकांमध्ये देशभक्ती आणि समाजसेवेची भावना निर्माण करण्यासाठी ती प्रयत्न करत आहे विविध माध्यमांद्वारे. अनेक तरुणी तिच्याकडे पाहून या क्षेत्रामध्ये उतरत आहेत. तिच्या कार्यामुळे समाजातील अनेक युवक-युवतींना प्रेरणा मिळाली आहे.

**-धम्मशील सावंत**, पाली

## इर्शाळवाडीतील दुर्घटनाग्रस्तांवर उपचार करणाऱ्या डॉ. सविता काळेल



आयुष्यात मी कठीण आणि अविश्वसनीय प्रवास केला असून बालरोगतज्ज्ञ, दोन मुलांची आई, मुलगी आणि धर्मपत्नी आहे, माझ्या कर्तव्यात कसूर होणार नाही, याची काळजी घेणे याला मी प्राधान्य देते असे चौक ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक सविता बाबासो काळेल यांनी सांगितले.

मानव धर्म हाच खरा धर्म, जन सेवा हीच ईश्वर सेवा मानून मी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागात वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाले, लाईट चा पत्ता नाही, दळणवळण साधन नाही, आणि सोय देखील नाही. तरीही बारा वर्षे त्या ठिकाणी सेवा करताना सर्पदंश, विंचू दंश हे नेहमीच असे, पण अनेक प्रसूती रात्री अपरात्री कराव्या लागत असत, आणि दुर्गम डोंगराळ भागातून चालत प्रवास करून रात्री, अपरात्री रुग्णांची भेट घेऊन उपचार करण्याची सवय जडली होती.

ठाणे येथे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये बदली झाल्यावर प्रचंड कामाचा ताण वाढला, २४ तास नोकरी, नेहमीच पोस्ट मोर्टेम तरीही न थकता सेवा देत राहिल्याने लेडी रजनीकांत असे डॉक्टर, नर्स बोलायचे. कधीही कुठला रुग्ण दगावला नाही, हेच मोठे समाधान मिळते. परत ठाणे येथे मनोरुग्ण हॉस्पिटल मध्ये बदली झाली, आणि खऱ्या अर्थाने रुग्णांशी जोडले गेले. सहनभूती पूर्ण हृदय, संवेदनशील मन, एक कौशल्यपूर्ण मेंदू या विश्वाला, मानवतेला न्याय देऊ शकतात, हे माझ्या लक्षात आले.

तुमच्या आवडीचे अनुसरण करा, तुमचे शिक्षण पूर्ण करा, स्वतःच्या पायावर उभे रहा, तुम्हाला हवे असलेले जिवन घडवण्याची शक्ती तुमच्यात आहे असा विचार त्यांनी व्यक्त केला. लग्ना पूर्वी आई वडील आणि नंतर पतीने साथ दिल्यानेच आपण हा प्रवास करू शकलो असे डॉ. सविता काळेल यांनी सांगितले.

**-अर्जुन कदम**, चौक

## सार्वजनिक उपक्रमात सक्रिय होणाऱ्या सुप्रिया शिंदे



आपली नोकरी सांभाळून नेत्र तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर अशा विविध सार्वजनिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेणाऱ्या व्यक्तीमत्व म्हणजे माणगाव येथील सुप्रिया संतोष शिंदे यांना सामाजिक कार्याची विशेष अशी आवड असून या कार्यात त्या झोकून देऊन काम करीत असतात.

सुप्रिया संतोष शिंदे यांचे शिक्षण बी.ए पदवीपर्यंत झाले आहे. त्यांचे पती संतोष शिंदे हे रिक्षा चालक आहेत. कुटुंबाचा गाडा सुखी रूपाने पुढे हाकण्यासाठी व आपल्या पतीला या दैनंदिन जीवनातील चित्र पाहता थोडीफार आर्थिक मदत होऊन त्यातून सुखी जीवन जगता यावे या गोष्टीकडे मेहेरनजर करीत सुप्रिया यांनी माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेट मेथा यांच्या तळेगाव येथील धनंजय राईस मिलमध्ये हिशोब तपासनिस पदावर नोकरी करण्याचे ठरवले गेली १० वर्षे या मिलमध्ये त्या हिशोब तपासनीस म्हणून दररोज सकाळी १० ते रात्री ८ यावेळेत मिलचे कामकाज पाहत आहेत.

प्रचंड आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी, मेहनत याच्या जोरावर त्यांनी मिल मालकाचा विश्वास संपादन केला आहेच शिवाय आपल्या सुखी संसाराला हातभार लावला आहे. आपली हि नोकरी सांभाळून सुप्रिया या सामाजिक उपक्रमात मिळेल त्या फावल्या वेळेत किंबहुना त्यातूनच थोडासा वेळ काढून झोकून देऊन काम करीत असतात. विजयशेट मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव व शंकर आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी होणाऱ्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात आलेल्या रुग्नांची नोंद करून घेऊन त्यांचे फॉर्म भरून घेत असतात. सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत सलग सहा तास न थकता त्या सचोटीने हे काम करीत असतात. शिवाय आलेल्या रुग्णांना योग्य ते मार्गदर्शन करीत असतात. आपले हे कार्य असेच बहरत जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करून आपणांस जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-सलीम शेख**, माणगाव

# रायगड जिल्ह्यात २० हजार ४८९ घरकुलांचे महिलांच्या हस्ते भूमिपूजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महिला दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात केंद्र आणि राज्य सरकार पुरस्कृत विविध घरकुल योजनेंतर्गत तब्बल २० हजार ४८९ घरकुलांचे भूमिपूजन ठिकठिकाणी महिलांच्या हस्ते करण्यात आले.

अलिबाग पंचायत समितीमार्फत वाडगाव आदिवासी वाडी येथे पंतप्रधान जनजाती आदिवासी न्यास अभियानमार्फत पीएम जन मन योजनेंतर्गत १९ घरकुलांचा भूमिपूजन सोहळा जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत पार पडला.



या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवनसंरक्षक राहूल पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, वाडगांव ग्रामपंचायत सरपंच सारिका पवार आणि उपसरपंच जयेंद्र भगत उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी घरकुलांची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या तसेच वाडगाव गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याबरोबरच एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला १०० टक्के कर वसुली पूर्ण करणारी ग्रामपंचायत आहे असे म्हणाले. गावातील शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी निरक्षरांसाठी विशेष वर्ग सुरू करून वाडगाव १०० टक्के साक्षर करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

महिलांच्या हस्ते एवढ्या मोठ्या प्रमाणात घरकुलांचे भूमिपूजन करण्याचा हा उपक्रम राज्यात पहिल्यांदाच राबवला जात असल्याचे डॉ. भरत बास्टेवाड यांनी सांगितले. ३१ मार्चपर्यंत वाडगांव आदिवासी वाडीतील १९ घरकुलांची कामे पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करत सर्व संबंधित विभागांनी वेळेत कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

# कर्जत चारफाटा ते श्रीराम पूल रस्ता खड्डेमुक्त!

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे प्रवेशद्वार असलेला चारफाटा ते श्रीराम पूल या मुख्य रस्त्यावर खूप खड्डे पडले होते. वाहन चालवताना खड्डे चुकविण्याच्या नादात अपघात होत होते. त्यामुळे वाहचालकांनी नाराजी व्यक्त केली होती. आता हे खड्डे भरले गेले आहेत. काही ठिकाणी डांबरीकरणाचे मोठे पट्टे टाकल्याने हा रस्ता खड्डे मुक्त करण्यात आल्याने वाहचालक समाधन व्यक्त करीत आहेत.

चारफाटा येथून नेरळ, माथेरान, कल्याण तसेच कर्जत शहर व मुरबाडकडे जाणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात असते. चारफाटा येथे खड्यांचे सम्राज्यच पसरले होते. त्यामुळे खड्डे चुकविण्यासाठी वाहचालकांना कसरत करावी लागत होती. शनिवारी व रविवारी कर्जत तालुक्यात फार्महाऊसवर येणाऱ्या व जाणाऱ्यांची खूप गर्दी होते. त्यामुळे बहुतेक वेळा वाहतूक कोंडी होत होती. खड्यांमुळे त्यात अजून भर पडत होती. त्यामुळे स्थानिकांसह बाहेरील वाहन चालकसुद्धा नाराज होते.



रस्ते विकास महामंडळाकडून या रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम दोन दिवस सुरू होते. माजी नगरसेवक संकेत भासे, दिनेश कडू यांनी या रस्त्यांवरील खड्डे चांगल्या प्रकारे भरावेत यासाठी लक्ष दिले. आता बहुतांश खड्डे भरल्याने वाहन चालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता अनुदान मंजूर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्यात महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना १ जुलै २०२४पासून लागू करण्यात आली आहे. योजनेंतर्गत पात्र महिलांचे अर्ज नारी शक्तीदूत ॲप आणि लाडकी बहीण वेब पोर्टलवरून भरण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकांना देण्यात आली होती. यानुसार रायगड जिल्ह्यासाठी एक कोटी १४ लाख ८३ हजार ९०० इतके अनुदान मंजूर झाले असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड–अलिबाग सुहिता ओव्हाळ यांनी दिली आहे.

आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकांना एकूण रु.१,१४,८३,९०० रुपयांचे प्रोत्साहन भत्त्याचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

अंगणवाडी सेविका यांनी नारीशक्ती दूत ॲप आणि लाडकी बहीण वेब पोर्टलवर यशस्वीपणे नोंदवलेल्या दोन लाख २९ हजार १८४ अर्जांवर आधारित रु.५० प्रति अर्ज प्रमाणे रु.१,१४,५९,२०० रुपये अनुदान मंजूर. मुख्य सेविकांनी नोंदवलेल्या ४९४ अर्जांवर आधारित रु.५० प्रति अर्ज प्रमाणे रु.२४,७०० अनुदान मंजूर झाले आहे. हे अनुदान तालुकानिहाय बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी) यांच्या डीडीओ खात्यावर वर्ग करण्यात आले असून, जागतिक महिला दिनानिमित्त अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकांच्या खात्यावर हे भत्ते वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे.

## पाणी गुणवत्ता तपासणी गावातील महिलांचे प्रशिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावातील पाच महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे गाव पातळीवर पाणी गुणवत्ता तपासणी करण्याकरिता कायमस्वरूपी यंत्रणा उभी करण्यास मदत होत असल्याचे मत पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी व्यक्त केले.



अलिबाग तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायतीत पाणी गुणवत्ता तपासणी महिलांचे प्रशिक्षण शुभांगी नाखले यांच्या उपस्थितीत झाले. पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवताना याबाबत नागरिकांत जनजागृती निर्माण करणे, पाणी व स्वच्छतेबाबत त्यांना सजग करण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत गावस्तरावर आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांच्या मार्फत पाणी गुणवत्ता तपासणी करण्याचे काम केले जाणार आहे.

पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील गावस्तरावर पाणी गुणवत्ता तपासणीसाठी पाच महिलांची निवड केली आहे. यामध्ये आशा सेविका व अंगणवाडी सेविका व बचत गटाच्या महिला कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

या वेळी पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड, पाणी गुणवत्ता सल्लागार आदिती मगर, संवाद सल्लागार नेहा थळे, पं.स. समूह समन्वयक रूपाली नाईक आदी उपस्थित होते.

## मुरूड तालुका बुरूड समाजाच्या अध्यक्षपदी परेश किल्लेकर यांची निवड



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका बुरूड समाजाची कार्यकारणी दर तीन वर्षांनी गठित करण्यात येते. यंदा नवीन कार्यकारिणी निवडण्यासाठी ऊसरोल येथील महेंद्र चौलकर यांच्या बंगल्यावर विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी अध्यक्षपदासाठी परेश प्रदीप किल्लेकर यांच्या नावाची सर्वानुमते निवड केली गेली.

परेश किल्लेकर हे विविध सांस्कृतिक व समाजभिमुख कार्यक्रम राबवून सर्व जनतेत सुपरिचित असे व्यक्तिमत्व आहे. त्यांची बुरूड समाज अध्यक्षपदी निवड होताच नवनिर्वाचित कार्यकारिणीकडून त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

नव्या कार्यकारिणीत सचिव म्हणून नंदकुमार अनंत सोनकर, खजिनदार महेंद्र सोनकर, कार्याध्यक्ष राजेंद्र जामकर, उपाध्यक्ष दीपक तेलंगे, सहसचिव सुजन खैरे, उपखजिनदार विजय महाले, वाघुळवाडी सल्लागार म्हणून अशोक करंबत आणि उदय किर्लेकर, जिल्हा खजिनदार सुधीर नागे, महेश जामकर, निलेश गायकवाड, मयूर साळुंखे, संतोष खैरे आदींची निवड करण्यात आली आहे.

या वेळी नवनिर्वाचित अध्यक्ष परेश किल्लेकर यांनी समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करून सामाजिक विकासकामास महत्त्व देत ती पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## वाकण येथे गायी, वासरांसह गोठा भस्मसात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील वाकण येथे बुधवारी दुपारी गुरांचा गोठा वणव्याने पसरलेल्या आगीमध्ये भस्मसात झाला. यामध्ये दोन गायी आणि दोन वासरांचा करूण अंत झाला

वाकण येथे महामून इब्राहिम जोगीलकर यांच्या दोन जर्सी गायी आणि दोन वासरे यांच्यासह पेंढा, वासे, मेढे, लगे, नांगर, इतर वस्तू व जोखड असा एकूण दोन लाख १८ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल गोठ्यासह खाक झाला. याचा पंचनामा प्रभारी ग्राममहसूल अधिकारी आर.बी. पवार यांच्यामार्फत पोलादपूर तहसील कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. जोगीलकर यांच्या उदरनिर्वाहाचे साधन हरपल्याने मदतीसाठी दानशूर व्यक्तींना आवाहन करण्यात आले आहे.

## महाड छबिना उत्सव काळातील कचरा पालिकेच्या स्वच्छतादूतांनी केला साफ

### २४ तासात शहर स्वच्छ!

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरात छबिना उत्सव नुकताच साजरा झाला. लाखो भाविकांनी वीरेश्वराचे दर्शन घेऊन जत्रेचा आनंद घेतला. या वेळी पडलेला कचरा नगर परिषदेच्या स्वच्छतादूतांनी २४ तासांत साफ करून शहर स्वच्छ केले. या स्वच्छतादूतांचे कौतुक केले जात आहे.



महाडचे ग्रामदैवत श्री वीरेश्वर महाराज छबिना उत्सवास यंदा २४ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली, तर १ मार्च रोजी रात्री मुख्य छबिना आणि दुसऱ्या दिवशी २ तारखेला मोडजत्रा झाल्याने दरवर्षीप्रमाणे या कालावधीत लाखो भाविक या ठिकाणी आले होते.

त्यामुळे विक्रेत्यांच्या मालाच्या प्लास्टिक पिशव्या, रिकाम्या पाण्याच्या व शीतपेयाच्या बॉटल्स, बंद खाद्यपदार्थांची रिकामी पाकिटे, पुठ्ठे, बॉक्स इत्यादी प्रकारचा मोठ्या प्रमाणातील कचरा छबिना उत्सव परिसरासह शहरभर पसरला होता.

छबिना उत्सव झाल्यानंतर पालिकेच्या स्वच्छतादूतांसमोर हा कचरा उचलणे एक मोठी जबाबदारी होती. दोन दिवस जवळपास १०० स्वच्छतादूतांनी दोन डंपर, एक ट्रॅक्टर, सहा टीप्पर आणि एका जेसीबीची मदत घेत तब्बल २७ टन कचरा गोळा करून तो लाडवली येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात रवाना केला.

अत्यंत तत्परतेने आपले कर्तव्य बजावत स्वच्छतादूतांच्या पथकाने शहर स्वच्छ करून दिल्याने नागरिकांकडून या स्वच्छतादूतांना धन्यवाद देण्यात येत असून सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

# उष्माघात : कारणे, लक्षणे, उपचार अन् काळजी!

उष्म लाटेची अद्याप जागतिक स्तरावर नेमकी अशी व्याख्या केली नसली तरी सर्वसाधारणपणे एखाद्या भागात/क्षेत्रात उच्च तापमानामध्ये आकस्मिकरित्या ४.५ अंश सेल्सिअसपेक्षा वाढ होणे यास उष्म लाट म्हणतात.

६.४ अंश सेल्सिअसपेक्षा तापमानात जास्त वाढ झाल्यास त्यास तीव्र उष्णतेची लाट म्हणतात. जागतिक स्तरावर युरोप, आशिया, अमेरिका, आफ्रिका या ठिकाणी वेगवेगळे निकष आहेत. कारण त्या त्या भागातील सर्वसाधारण हवामानाची स्थिती ही वेगवेगळी असते. आपल्या देशात हवामान खाते व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निकषानुसार मैदानी भागात ४० डिग्री अंश सेल्सिअस, डोंगराळ भागात ३० डिग्री अंश सेल्सिअसपेक्षा व समुद्र किनारी भागात ३७ अंश डिग्रीपेक्षा जास्त तापमान जात असल्यास त्यास उष्मलाट प्रवण क्षेत्र मानले जाते. तापमानात झालेली वाढ ही हवामान खात्याच्या दोन उपविभागांमध्ये सलग दोन दिवस ४.५ डिग्रीपेक्षा जास्त नोंदविल्यास दुसऱ्या दिवशी उष्म लाट म्हणून जाहीर केली जाते.

उष्मा–लहर ही वातावरणीय तापमानाची स्थिती आहे. ज्यामुळे शारीरिक ताण येतो. कधी कधी मानवी जीवनावर अतिशय विपरीत परिणाम होत असतो. कोणत्याही ठिकाणचे कमाल तापमान सलग दोन दिवस ४५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास त्याला उष्मा लहरी स्थिती म्हणतात.

पर्यावरणाचे तापमान ३७ अंश सेल्सिअसवर राहिल्यास मानवी शरीराला कमी हानी होण्याची शक्यता आहे, कारण मानवी शरीराचे तापमान ३७ अंश असते. जेव्हा पर्यावरणाचे तापमान ३७ अंशांच्या वर वाढते तेव्हा मानवी शरीराला वातावरणातून उष्णता मिळू लागते. जर आर्द्रता जास्त असेल, तर ३७ डिग्री सेल्सिअस किंवा ३८ डिग्री सेल्सिअस तापमान असतानाही एखाद्या व्यक्तीला उष्णतेच्या ताणाचे विकार होऊ शकतात. आर्द्रतेच्या प्रभावाची गणना करण्यासाठी आपण उष्णता निर्देशांक मूल्ये वापरू शकतो. उष्णता निर्देशांक हे वास्तविक हवेच्या तपमानाच्या सापेक्ष आर्द्रतेचे घटक असताना खरोखर किती गरम वाटते याचे मोजमाप आहे. उदाहरणार्थ, जर हवेचे तापमान ३४ अंश असेल आणि सापेक्ष आर्द्रता ७५% असेल, तर उष्णता निर्देशांक किती गरम वाटते ते ४९ अंश आहे. जेव्हा सापेक्ष आर्द्रता १००% असते तेव्हा हाच प्रभाव केवळ ३१ अंशावर पोहचतो. तापमान व आर्द्रता यांचा तक्ता सोबत ठेवला आहे. खालील तक्त्यामध्ये तापमान व सापेक्ष आद्रता निर्देशांक नमूद केलेला आहे.

उष्माघात हा एक गंभीर वैद्यकीय आपत्कालीन स्थिती आहे जो शरीराच्या तापमानाचे नियंत्रण यंत्रणा असफल झाल्याने होतो. प्रखर उष्णतेमुळे शरीराचे तापमान १०४ अंश फॅरनहिट (४० अंश सेल्सिअस) किंवा त्याहून अधिक होते, ज्यामुळे विविध अवयवांवर विपरीत परिणाम होतो. योग्य वेळी उपचार न केल्यास उष्माघात प्राणघातक ठरू शकतो.

### उष्माघाताची कारणे

उष्माघात मुख्यतः दोन प्रकारांमध्ये वर्गीकृत केला जातो. एक श्रम संबंधित उष्माघात. शारीरिक श्रम करत असताना, विशेषतः उन्हात काम करताना किंवा व्यायाम करताना होतो. खेळाडू, मजूर, शेतकरी यांना धोका अधिक असतो.

दुसरा अश्रम संबंधित उष्माघात. दीर्घकाळ प्रखर उन्हात किंवा उष्ण वातावरणात राहिल्यास होतो. लहान मुले, वयोवृद्ध व्यक्ती, तसेच ज्या लोकांमध्ये शरीराचे तापमान नियंत्रण कमी असते त्यांना याचा जास्त धोका असतो. उष्माघाताची लक्षणे पटकन ओळखणे खूप महत्त्वाचे आहे.

### उष्माघाताची काही प्रमुख लक्षणे

शरीराचे तापमान १०४ फॅरनहिट (४० अंश सेल्सिअस) पेक्षा अधिक, घाम येणे थांबते (कोरडी त्वचा), चक्कर येणे आणि थकवा, डोकेदुखी, मळमळ, उलट्या, हृदयाचे ठोके वाढणे, भान हरपणे, गुंगीत जाणे किंवा बेशुद्धावस्था, हात–पाय मुरगळणे किंवा झटके येणे.

उष्माघाताचा धोका पुढील गटांसाठी अधिक असतो. वयोवृद्ध आणि लहान मुले, हृदयविकार, उच्च रक्तदाब असलेले रुग्ण, मधुमेह, लठ्ठपणा असलेले लोक, बाहेर उन्हात काम करणारे मजूर आणि शेतकरी, खेळाडू आणि सैन्यातील जवान.

### उपाय आणि उपचार

उष्माघात झाल्यास खालील गोष्टी त्वरीत करा. व्यक्तीला सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवा. कपडे सैल करा आणि शरीरावर थंड पाणी शिंपडा. बर्फाच्या पिशव्यांचा उपयोग करून मान, बगल आणि मांड्यांवर शेक द्या. गार पाणी पाजण्याचा प्रयत्न करा, पण बेशुद्ध व्यक्तीला पाणी पाजू नका. तातडीने वैद्यकीय मदत घ्या.

रुग्णालयात पुढील उपचार केले जातात. Intravenous (IV) fluids देऊन शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता भरून काढणे. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी विशेष शीतकरण तंत्र वापरणे (जसे की आईस बाथ किंवा ओले कपडे गुंडाळणे). हृदयाचे ठोके आणि श्वासोच्छ्वास यांचे निरीक्षण.

### उष्माघात टाळण्यासाठी पुढील गोष्टींची काळजी घ्या

भरपूर पाणी प्या, दिवसभरात नियमित अंतराने पाणी प्या, जरी तहान लागली नसली तरी. हलके आणि सैलसर कपडे परिधान करा, उष्ण हवामानात सुती कपडे घाला, थेट उन्हापासून बचाव करा, शक्यतो दुपारच्या वेळेस (११ ते ४) बाहेर जाणे टाळा, शारीरिक श्रम कमी करा, प्रखर उन्हात व्यायाम किंवा काम करणे टाळा, योग्य आहार घ्या, फळांचे रस, नारळ पाणी, ताक यांचा समावेश आहारात करा.

उष्माघात ही गंभीर स्थिती असून वेळीच उपचार न केल्यास जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे लक्षणे ओळखणे, तातडीने कृती करणे आणि योग्य प्रतिबंध करणे महत्त्वाचे आहे. गरम वातावरणात स्वतःची काळजी घेणे आणि इतरांनाही सावध करणे गरजेचे आहे.



## आशियाई अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# भारतीय महिला संघ विजेता

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या महिला संघाने इराणमधील तेहरान येथे झालेल्या सहाव्या महिला आशियाई अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. अंतिम सामन्यात भारताने इराणला ३५-२२ असे नमवित पाचव्यांदा या चषकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेत एकूण सात देशाचे संघ सहभागी झाले होते. भारताचा समावेश अ गटात होता. त्या गटात बांगलादेश, थायलंड व मलेशिया हे संघ होते. साखळी सामन्यात भारताने सर्व सामने एकतर्फी जिंकत अव्वल स्थान मिळविले होते. उपांत्य सामन्यात भारताने नेपाळचा ५६-१८ असा पराभव करीत अंतिम फेरी गाठली.

अंतिम फेरीत संघनायिका सोनाली शिंगटे, पूजा यांच्या धारदार चढाया त्यांना साक्षी शर्मा, ज्योती यांची मिळालेली पकडीची साथ यामुळेच भारताने हे जेतेपद मिळविले.

तेहरानला या स्पर्धा आयोजनाची दुसऱ्यांदा (प्रथम २००७ व आता २०२५) संधी मिळाली. भारताने या स्पर्धेची सहापैकी पाच पदके जिंकली आहेत. फक्त एकदाच दक्षिण कोरिया संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळविले होते.

## रोहितने खेळपट्टीवर टिकणे आवश्यक -सुनील गावसकर



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा कर्णधार रोहित शर्मा गुणी फलंदाज आहे. त्याने खेळपट्टीवर टिकून राहून मोठी खेळी करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्याची खेळपट्टीवरील उपस्थिती भारतासाठी खूप प्रभाव पाडू शकते, असे मत भारताचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनी व्यक्त केले.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय कर्णधार रोहितने वेगवान सुरुवात करण्याचा दृष्टिकोन अवलंबला आहे, पण या प्रयत्नांत तो अनेकदा लवकर बाद झाला आहे. त्याने वेगवान पवित्रा घेण्यात चूक काहीच नाही, मात्र संघाचे हित लक्षात घेता त्याने खेळपट्टीवर अधिक वेळ टिकणे महत्त्वाचे आहे, असे गावसकर यांनी म्हटले आहे.

वेगवान फलंदाजी करणे हा एक भाग झाला, पण त्याने स्वतःला अधिक काळ खेळपट्टीवर टिकून राहण्यासाठी थोडा संयम बाळगण्याची गरज आहे. रोहित जेव्हा असा संयम बाळगतो, तेव्हा सामना प्रतिस्पर्ध्यांच्या हातून गेलेला असतो, असे गावस्कर यांचे म्हणणे आहे. रोहितसारख्या फलंदाजांनी २५ ते ३० धावसंख्येवर समाधान मानून उपयोगी नाही. तो अधिक षटके किंवा अगदी २५ षटके जरी मैदानात टिकला, तर भारताची धावसंख्या १८० ते २००च्या घरात येईल. तेव्हा जर दोनच गडी बाद झाले असतील, तर अशा वेळी भारत ३५०च्या आसपास मजल निश्चित मारू शकेल, असे गावसकर यांनी नमूद केले.



## पळस प्रीमियर लीगचा शुभारंभ

**नागोठणे : बातमीदार**

महिला दिनाचे औचित्य साधून पळस प्रीमिअर लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेचा शनिवारी (दि. ८) मान्यवरांच्या हस्ते शानदार शुभारंभ झाला.

सामाजिक कार्यकर्ते कै. किशोर भालेकर यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी नागोठणे विभागातील राष्ट्रवादीचे नेते शिवराम शिंदे, पळस उपसरपंच चंद्रकांत भालेकर व माजी सरपंच हिराजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कै. किशोर भालेकर मित्र परिवार गेले तीन वर्ष पळस या स्पर्धेचे अतिशय नियोजनबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने आयोजन करीत आहेत.

स्पर्धेत जय भवानी इंडियन्स (संघ मालक हिराजी शिंदे), ओम इलेव्हन पळस (संघ मालक चंद्रकांत भालेकर), के.बी.जे.सी. वाघळी (संघ मालक तुकाराम कदम व प्रकाश कदम), एस.व्ही. इलेव्हन (संघ मालक निष्ठा योगेश विचारे), देवा ॲण्ड रूद्रा फायटर्स (संघ मालक सचिन शेलार) आई पळसाई वॉरियर्स (संघ मालक दिनेश इंद्रे व नितीन शिर्के) या संघांनी सहभाग घेतला आहे. विजेत्या संघास २१ हजार रुपये, उपविजेत्या १५ रुपये व दोन्ही संघांना चषक तसेच वैयक्तिक पारितोषिके देण्यात येणार आहेत.

स्पर्धेच्या शुभारंभावेळी पळस सरपंच सुप्रिया डाकी, उपसरपंच चंद्रकांत भालेकर, माजी सरपंच निष्ठा विचारे, हिराजी शिंदे, मारूती शिर्के, सदस्य किसन बोरकर, पप्पू वाघमारे, तुकाराम कदम, सचिन जोशी, महादेव शिंदे, बबन शिंदे, योगेश विचारे, विश्वास डाकी, श्रीरंग कदम, बाबू तांबोली, महेंद्र कदम आदी उपस्थित होते.

## फलंदाजीचा सराव करताना विराट कोहलीला दुखापत?



**दुबई : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना ९ मार्च रोजी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळला जाणार आहे. दोन्ही संघ जोरदार तयारी करत आहेत, पण याआधीच भारतीय संघासाठी चिंता वाढवणारी एक बातमी आली आहे. सराव सत्रादरम्यान भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीला दुखापत झाल्याचे एका वृत्तात म्हटले आहे.

सराव करताना विराट वेगवान गोलंदाजांचा सामना करत होता. आयसीसी अकादमीमधील सराव सत्रादरम्यान एक चेंडू त्याच्या गुडघ्याला लागला. यानंतर त्याने फलंदाजी करणे थांबवले. भारतीय संघाचे फिजिओ त्याच्या दुखापतीबाबत माहिती घेत असून प्राथमिक उपचार करत आहेत. दिलासा देणारी बाब म्हणजे कोहलीची दुखापत फारशी गंभीर नसल्याचे सांगितले जात आहे.

## सीकेटी कॉलेज येथे मुलींची आंतर-विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा रंगली




### मुंबई उपनगर संघ विजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या मैदानावर मुंबई विद्यापीठाच्या समन्वयाने मुलींची आंतर विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा शनिवारी (दि. ८) आयोजित करण्यात आली होती. यामध्ये मुंबई उपनगर विभागाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे या विभागांचे तीन संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांच्या हस्ते झाले. द्वितीय क्रमांक ठाणे विभाग व तृतीय क्रमांक मुंबई शहर विभागाने मिळवला. प्राचार्य डॉ. पाटील यांनी विजेत्या संघांना पारितोषिके देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. प्रतिज्ञा पाटील तसेच सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुंबई इंडियन्सच्या कॅप्टनवर दंडात्मक कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग स्पर्धेतील तिसऱ्या हंगामात यूपी वॉरियर्ज विरुद्धच्या लढतीत मुंबई इंडियन्सची कॅप्टन हरमनप्रीत कौरचा पारा चढल्याचे पहायला मिळाले. आधी तिने पंचाशी हुज्जत घातली. मग त्यात ढवळाढवळ केल्याचा राग काढत ती सोफी एसलस्टोनच्या अंगावर धावून गेल्याचा सीन दिसला. मुंबई इंडियन्सच्या कॅप्टनवर बीसीसीआयने कारवाई केली आहे.

मुंबई इंडियन्सच्या संघाने मॅच जिंकली, पण कॅप्टन हरमनप्रीत कौरला यूपीविरुद्धच्या लढतीत दाखवलेला तोरा महागात पडला आहे. या सामन्यात निर्धारित वेळेत षटके पूर्ण न केल्यामुळे मुंबई संघाला अखेरच्या षटकात सर्कल बाहेर फक्त तीन खेळाडू ठेवण्याची वेळ आली होती. पंचाच्या या निर्णयाविरोधात हरमनप्रीत कौर हुज्जत घालताना दिसली होती. याबद्दल हरमनप्रीतला अचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणात कलम २.८ नुसार लेवल १ दोषी ठरवण्यात आले आहे. मुंबईच्या कॅप्टननेही आपली चूक मान्य केली आहे. तिला मॅच फीच्या १० टक्के रक्कम दंडात्मक स्वरूपात द्यावी लागणार आहे.

## चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर वनडेतूनही रोहित आणि विराट निवृत्त होणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचे स्टार फलंदाज कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीसंदर्भात पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. गेल्याच वर्षी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर या दोन्ही फलंदाजांनी खेळाच्या या सर्वात छोट्या फॉरमॅटमधून अर्थात टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. यानंतर आता त्यांच्या वन डे क्रिकेटमधून निवृत्तीसंदर्भात चर्चा सुरू झाली आहे.

या संदर्भात माजी क्रिकेटर आकाश चोप्राने आपले मत व्यक्त केले आहे. चोप्रा म्हणाला, हा निर्णय खेळाडू घेतील, मात्र त्यांनी असे केले, तर त्यांच्या निर्णयाविरुद्ध युक्तिवाद करणे कठीण होईल.



चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चा अंतिम सामना ९ मार्च रोजी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळला जाणार आहे. हा सामना दुबईतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी आयसीसी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली होती. याच पद्धतीने ते चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यानंतर ५० षटकांच्या फॉरमॅटसंदर्भातही निर्णय घेऊ शकतात, असा अंदाज अनेक जण बांधत आहेत.

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीसंदर्भात बोलताना आकाश चोप्रा म्हणाला, हे पूर्णपणे त्यांच्यावरच अवलंबून आहे. मी प्रामाणिकपणे सांगेन की, हे सोपे नसेल. कोहलीने २०२५मध्ये दमदार कामगिरी केली आहे, तर रोहितचीही कामगिरी बरी राहिली आहे. त्यांची कामगिरी चांगली राहिली असे मी म्हणणार नाही. ते अंतिम सामन्यातही शतक झळकावून हे चित्र बदलू शकतात.

चोप्रा पुढे म्हणाला, ते निवृत्त होतील का? असे मला कुणी तरी विचारले. मी म्हणालो, मला माहीत नाही. टी-२० विश्वचषकानंतर त्यांचा निवृत्तीचा निर्णय तर्कसंगत वाटत होता, पण त्यांनी टी-२० आणि एकदिवसीय अशा दोन्ही फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली, तर त्यांच्याकडे केवळ कसोटी सामनेच राहतील. ते त्याच मार्गाने जाणार का? कोणास ठाऊक.

## 'स्वामी समर्थ श्री'मध्ये महाराष्ट्रातील शरीररसौष्ठवाचे ग्लॅमर

### प्रभादेवीत आज रंगणार राज्यस्तरीय स्पर्धेचा पीळदार थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रीडा क्षेत्रात आपली ओळख निर्माण करणाऱ्या स्वामी समर्थ क्रीडा मंडळाच्या स्वामी समर्थ श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेच्या माध्यमातून मुंबईकर शरीरसौष्ठवप्रेमींना जानदार, शानदार आणि पीळदार शरीरसौष्ठवपटूंचे ग्लॅमर पहायला मिळणार आहे. प्रभादेवी येथे दत्तू बांदेकर चौकात रविवारी (दि. ९) होत असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकापेक्षा एक अशा १२५पेक्षा अधिक खेळाडूंमध्ये द्वंद्व रंगेल.

गेली आठ दशके कबड्डीसह शरीरसौष्ठव खेळात एकापेक्षा एक स्पर्धांचे आयोजन करण्याबरोबर खेळाडू घडवणाऱ्या स्वामी समर्थ क्रीडा मंडळाने यंदा आपल्या स्पर्धेला भव्य आणि दिव्य करण्यासाठी राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातून शरीरसौष्ठवांना



'स्वामी समर्थ श्री'मध्ये येण्याचे आवाहन केले असल्याचे स्पर्धाप्रमुख जयराम शेलार यांनी सांगितले. त्यामुळे सुमारे सव्वाशे खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविल्याची माहिती महाराष्ट्र शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव राजेंद्र चव्हाण यांनी दिली.

सव्वा तीन लाखांच्या रोख पुरस्कारांचा वर्षाव केला जाणाऱ्या या स्पर्धेत विजेत्याला ५५ हजार ५५५ रुपयांचे इनाम दिले जाणार आहे. उपविजेत्याच्या मेहनतीलाही प्रोत्साहन म्हणून २२ हजार २२२ रुपयांचा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. स्पर्धा ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८० आणि ८० किलोवरील अशा एकंदर सात गटात खेळली जाणार असून प्रत्येक गटात अव्वल तीन खेळाडूंना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकासह पहिल्या पाच खेळाडूंना १०, ८, ६, ४ आणि ३ हजार अशी रोख रकमेची बक्षीसेही दिली जातील.

स्पर्धेत भारत श्री स्पर्धेत जबरदस्त कामगिरी करणारे शशांक वाकडे (मुंबई), विश्वनाथ बकाली (सांगली), रामा मायनाक (सातारा), नितीन म्हात्रे (पश्चिम ठाणे), रोशन नाईक (पालघर) या दिग्गजांसह अर्शद मेवेकरी (सांगली), ओंकार नलावडे (पुणे), पंचाक्षरी लोणार (सोलापूर), संतोष शुक्ला (ठाणे), नीलेश खेडेकरसारखे (मुंबई) तयारीतले खेळाडू आपल्या पीळदार देहयष्टीची किमया दाखविणार आहेत.

### महिला आणि दिव्यांगाचीही स्पर्धा

*राज्यातील शरीरसौष्ठवपटूंच्या थराराबरोबर महिलांच्या शरीरसौष्ठव स्पर्धेचाही एक गट या स्पर्धेत खेळविला जाणार आहे. यातही राज्यातील अव्वल महिला शरीरसौष्ठवांचा सहभाग निश्चित असल्याची माहिती राजेंद्र चव्हाण यांनी दिली. एवढेच नव्हे तर दिव्यांगाच्या शरीरसौष्ठव स्पर्धेलाही प्रोत्साहन दिले जाणार आहे.*

प्रभादेवीत अनेक वर्षांनतर राज्यस्तरीय ग्लॅमर असलेली मोठी स्पर्धा होतेय, ज्यात महाराष्ट्र शरीरसौष्ठवाची खरी पीळदार श्रीमंती मुंबईकरांना पाहायला मिळेल. प्रत्येक गटात गटविजेतेपदासाठी प्रचंड संघर्ष होणार हे निश्चित आहे.

## आयपीएल खेळण्याची पाकिस्तानी क्रिकेटपटूची इच्छा



**कराची : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या पहिल्या हंगामात पाकिस्तानी खेळाडूही स्पर्धेत खेळताना दिसले होते, पण २००८मध्ये मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानी खेळाडूंना या लीगमध्ये खेळण्यास बंदी घालण्यात आली. असे असले तरी आता आयपीएलच्या पुढील हंगामात एक पाकिस्तानी खेळाडू खेळताना दिसू शकतो. या खेळाडूने स्वतःच याबाबतची माहिती दिली आहे.

पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने आयपीएलमध्ये खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मोहम्मद आमिरने २०२६मध्ये होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये खेळण्यास पात्र असल्याचे उघड केले आहे आणि संधी मिळाल्यास तो खेळेल, असेही म्हटले आहे.

मोहम्मद आमिरची पत्नी नर्गिस ही यूकेची नागरिक आहे. आमिरदेखील यूकेमध्ये राहतो. अशा परिस्थितीत त्याने यूके नागरिकत्वासाठी अर्ज केला आहे. जर त्याला नागरिकत्व मिळाले, तर तो आयपीएलमध्ये खेळण्यासाठी पात्र ठरेल असे सांगितले जात आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com